



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १०२ * नांदेड * शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# महिला आरक्षण विधेयक नामंजूर

## विधेयकाच्या बाजूनं २९८ तर विरोधात २३० मतं, केंद्र सरकारला धक्का

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** केंद्र सरकारकडून मांडण्यात आलेले महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाले आहे. या विधेयकाच्या बाजूने २९८ तर विरोधात २३० मते मिळाली आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारनं संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक २०२६, केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक २०२६ आणि सीमांकन विधेयक, २०२६ लोकसभेत सादर केली होती. या विधेयकांच्या बाजूनं पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह सत्ताधारी पक्षातील विविध नेत्यांनी भूमिका मांडली. तर, विरोधी पक्षांकडून अखिलेश यादव, प्रियंका गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, अरविंद सावंत, अमोल कोल्हे, वर्षा गायकवाड, कल्याण बॅनर्जी यांच्यासह विरोधी पक्षांनी बाजू मांडली. हे घटनादुरुस्ती विधेयक असल्यानं मंजूर करण्यासाठी लोकसभेतील उपस्थित सदस्यांच्या दोन तृतियांश मते आवश्यक असतात. लोकसभेत या घटनादुरुस्ती विधेयकावर मतविभाजनाद्वारे मतदान घेण्यात आलं. घटनादुरुस्तीच्या बाजूनं पहिल्या फेरीत २९८ मतदान झालं, तर घटनादुरुस्ती विधेयकाच्या विरोधात २३० मतं नोंदवली गेली आहेत. एकूण ५२८ खासदारांनी मतदानं केलं, आता राज्यसभेत शनिवारी मतदान होणार आहे. ५२८ चं दोन तृतियांश ३५२ होतं त्यामुळं घटनादुरुस्ती विधेयक मंजुरीसाठी आवश्यक संख्याबळ सरकारकडे नसल्याचं स्पष्ट झालं. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक, २०२६ नामंजूर झाल्याचं जाहीर केलं. यानंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी इतर दोन विधेयकं पुढं न नेण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्र सरकारकडून महिला आरक्षण लोकसभेत आणि विधानसभेत संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयकात लोकसभेच्या जागा वाढवण्याचं प्रस्तावित केलं आहे. २०२९ च्या निवडणुकीत लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागांमध्ये वाढ करुन राज्यातील लोकसभेच्या जागा ८१५ आणि केंद्रशासित प्रदेशांच्या जागा ३५ जागा मिळून ८५० जागा करण्याचा प्रस्ताव विधेयकात होता. सरकारचा महिला आरक्षणातील दुरुस्ती विधेयकासोबत लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेचं विधेयक मांडलं होतं.

### विरोधकांचा आक्षेप का?

विरोधी पक्षांकडून महिला आरक्षण विधेयक २०२३ मध्ये मंजूर करण्यात आल्याची भूमिका मांडण्यात आली. केंद्र सरकारचा महिला आरक्षण विधेयकासोबत परिसीमन विधेयक आणल्यानं विरोधी पक्षांनी सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी सरकारनं आणलेल्या विधेयकावर बोलताना यापूर्वी महिला आरक्षण विधेयकाला सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी विरोध केल्याचं म्हटलं होतं. केंद्र सरकारला महिला आरक्षण लोकसभा आणि विधानसभेत लागू करायचं असेल तर ५४३ जागांमध्येच अंमलबजावणी करावी, अशी भूमिका प्रियांका गांधी यांनी मांडली. केंद्र सरकारचा लोकसभेची सदस्यसंख्या ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रयत्न वरवर पाहता यात आपत्ती वाटत नाही मात्र सखोलपणे विचार केल्यास यातील राजकीय हेतू लक्षात येतो, असं प्रियांका गांधी म्हणाल्या होत्या.

# चार बालकांच्या मृत्यूप्रकरणी दोन अभियंते निलंबित; तीन जणांना कारणे दाखवा नोटीस

## मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील देगलूर नाका भागातील एका डबक्यात चार चिमुकल्यांच्या मृत्यूप्रकरणी महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी कारवाई केली आहे. उपअभियंता शिवकल्याणी जायभाये, कनिष्ठ अभियंता किरण सूर्यवंशी यांना निलंबित करण्यात आले असून प्रभारी कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, उपअभियंता प्रकाश कांबळे व कनिष्ठ अभियंता जकी अहमद यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. ही कारवाई घटना घडल्यानंतर २४ तासांच्या आत द्विसदस्यीय समितीच्या अहवालावरून आयुक्त यांनी केली आहे.



देगलूर नाका भागातील एमजीआर गार्डनच्या बाजूला विकास काम सुरू आहे. तर काही खासगी लोकही आपल्या मोकळया जागेचा विकास करत आहेत. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या खोदकामामुळे येथे मोठे डबके तयार झाले आहे. यात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. याच डबक्याच्या पाण्यात ४ शाळकरी मुलांचा बुडून मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर घटनेचे गांभीर्य ओळखून डॉ. डोईफोडे यांनी अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, आपत्ती व्यवस्थापनाचे मिर्झा बेग यांची द्विसदस्यीय समिती स्थापन केली. या घटनेचा २४ तासांच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार दि. १७ एप्रिल रोजी दुपारी २४ तासांच्या आत अहवाल प्राप्त होताच महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी उपअभियंता शिवकल्याणी जायभाये, कनिष्ठ अभियंता किरण सूर्यवंशी यांना निलंबित केले असून प्रभारी कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, उपअभियंता प्रकाश कांबळे व कनिष्ठ अभियंता जकी अहमद यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

दि. १७ एप्रिल रोजी महापौर कविता मुळे यांनी घटनास्थळाची पाहणी व पीडित कुटुंबियांच्या घरी सांत्वनपर भेट दिली. यावेळी उपमहापौर दीपक रावत, सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले आदींची उपस्थिती होती.

# मराठी न शिकवणाऱ्या शाळांची मान्यता रद्द होणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या आणि सर्व मंडळांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषेचे अध्यापन सक्तीचे असतानाही, या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या शाळांविरुद्ध महाराष्ट्र सरकारने आता कठोर पाऊल उचलले आहे. मराठीचा विषय अनिवार्य न करणाऱ्या शाळांना दंड करून न थांबता, त्यांची मान्यता किंवा ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शालेय शिक्षण विभागाने शुक्रवारी घेतला.

राज्यात 'मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन व अध्ययन अधिनियम, २०२०' लागू होऊन चार वर्षे उलटली तरीही, विशेषतः खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये या कायद्याची पायमल्ली होत असल्याचे सरकारच्या निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर, अशा शाळांना वठणीवर आणण्यासाठी शासनाने दंडात्मक कारवाईची आणि मान्यता काढण्याची विस्तृत कार्यपद्धती (एसओपी) जाहीर केली आहे.

त्यानुसार, मराठी भाषेची अंमलबजावणी तपासण्यासाठी आता शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी आणि शिक्षण निरीक्षक यांच्या पथकात मराठी विषयातील तज्ज्ञ शिक्षकाचा समावेश केला जाणार आहे. शाळा सुरू झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत ही पडताळणी पूर्ण करून त्याचा अहवाल शिक्षण संचालकांना सादर करावा लागणार आहे. नियम मोडणाऱ्या शाळांना विभागीय शिक्षण उपसंचालकांकडून पहिल्यांदा नोटीस बजावण्यात येईल. संबंधित शाळा व्यवस्थापनाला १५ दिवसांच्या आत यावर खुलासा द्यावा लागेल, असे आदेशात नमूद केले आहे.

# खासगी ट्रॅव्हल्स अन् कारचा भीषण अपघात; ६ प्रवाशांचा होरपळून मृत्यू

**कोल्हापूर (प्रतिनिधी)–** कर्नाटकातील यादगीर जिल्ह्यात खासगी ट्रॅव्हल्स आणि कारचा भीषण अपघात झाला. खासगी आराम बस आणि कार एकमेकांवर आदळल्याने लागलेल्या आगीत सहा प्रवासी होरपळून मृत्यूमुखी पडले. यादगीर जिल्ह्यातील सुरपूर तालुक्यातील शांतगिरी क्रॉस येथे हा अपघात घडला. या घटनेनंतर स्थानिकांनी लगेचच घटनास्थळी धाव घेतली. मात्र, प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



खासगी आरामदायी बस बंगळुरुहून कलबुर्गीला निघाली होती, तर कार विरुद्ध दिशेने येत होती. भरधाव कार खासगी आराम बसला येऊन धडकली असता बसने लगेच पेट घेतला. या भीषण दुर्घटनेत बसने पेट घेतल्यानंतर बसमधील प्रवाशांनी जीव वाचवण्यासाठी हाताला मिळेल ते आपले सामान घेऊन बसमधून बाहेर पडण्याची धडपड केली. मात्र, बसमधील सहा प्रवाशांचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. तर, इतर प्रवाशांना आपला जीव वाचविण्यात यश मिळाले. या दुर्घटनेत अनेक प्रवासी देखील जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी हॉस्पिटलला हलविण्यात आले आहे.

बस आणि कार यांच्यातील अपघात आणि आगीचे वृत्त कळताच अग्निशमक दल पाण्याच्या गाडीसह घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी आग विझवली. पण, तोपर्यंत बस आगीत जळून खास झाली होती. अपघातात होरपळून मृत्यूमुखी पडलेले सहा जण एकाच कुटुंबातील असून ते देव दर्शनावरून परत येत होते. कार ओव्हरटेक करताना हा अपघात घडल्याचे यादगीर एस.पी. पृथ्वीक शंकर यांनी सांगितले.

# अखेर इराणने खुली केली होर्मुझची सामुद्रधुनी

**तेहरान (वृत्तसंस्था)–** गेल्या दीड महिन्यांपासून बंद असणारी होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे खुली करण्याचा निर्णय इराणने घेतला आहे. युद्धविरामाच्या उर्वरीत काळात होर्मुझ सामुद्रधुनी पूर्णपणे खुली असेल, अशी घोषणा इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी केली आहे. सर्व व्यावसायिक जहाजांसाठी सामुद्रधुनी खुली असेल, असे मंत्री अराघची यांनी स्पष्ट केले आहे. इराणच्या या निर्णयाचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वागत केले आहे.

# राज्यातील ६६ हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना अवकाळीचा फटका

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीसह पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. एकूण ६६ हजार ३१२ शेतकरी या अवकाळी संकटामुळे बाधित झाले असून, बळीराजाला दिलासा देण्यासाठी ५३ कोटी ७३ लाख ७ हजार रुपयांची मदत मंजूर केल्याची माहिती मदतीचा मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.

शासनाकडून उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार, राज्यातील विविध विभागांतील सुमारे ४९ हजार ५११.७२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे या अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे. यात प्रामुख्याने अमरावती विभागाला निसर्गाच्या कोपाचा सर्वाधिक फटका बसला असून, बुलढाणा आणि यवतमाळ जिल्ह्यांतील ५१ हजार ७२९ शेतकरी बाधित झाले आहेत. या विभागात तब्बल ४२ हजार ३८८.९७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले असून, त्यासाठी ४२३७.९७ लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. त्यापाठोपाठ छत्रपती संभाजीनगर विभागात नांदेड, लातूर व बीड जिल्ह्यांमध्ये ८,५१५ शेतकरी बाधित झाले असून, तेथील ३,४९१.०३ हेक्टर क्षेत्रासाठी ४४४.०२ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे.

पश्चिम महाराष्ट्रात पुणे विभागांतर्गत सोलापूर व सातारा जिल्ह्यांमध्ये ४,५६४ शेतकरी बाधित झाले असून, ९६६.२ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. या जिल्ह्यांसाठी ५७७.९३ लाख रुपयांची मदत शासनाने मंजूर केली आहे.

# राज्यात उष्णतेच्या लाटेसह अवकाळी पावसाची शक्यता


**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात शनिवार, दि. १८ एप्रिल रोजी हवामानाचा दुहेरी स्वरूपाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. काही जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरणासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता असून काही भागांत उष्णतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे राज्यात एकीकडे दिलासा देणारा पाऊस तर दुसरीकडे उष्णतेचा तडाखा अशी परिस्थिती पाहायला मिळणार आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार आज मराठवाड्यात बीड आणि लातूर जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता असून धाराशिवमध्ये पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड येथे उष्णतेचा येलो अलर्ट असून तापमान ३८ ते ४१ अंशांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

यासह कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात ढगाळ वातावरणासह मध्यम पावसाची शक्यता आहे. उर्वरित कोकणातील मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी या भागांत हवामान कोरडे राहण्याचा अंदाज असून कमाल तापमान ३४ ते ३६ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २५ ते २७ अंशांच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर, सातारा आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरणासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. पुणे, सोलापूर आणि परिसरात उष्णतेची तीव्रता जाणवणार असून सोलापूरमध्ये पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात कमाल तापमान ३६ ते ३९ अंशांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. यासह विदर्भातील अकोला, अमरावती, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागात तापमान ४० ते ४३ अंशांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.




**नांदेड** : शहरातील देगलूरनाका भागातील इस्लामपूरा येथील चार बालकांच्या झालेल्या मृत्यूची सखोल चौकशी करून गुत्तेदारावर कारवाई करावी व शासनाकडून त्वरीत मोबदला मिळावा या मागणीचे निवेदन पालकमंत्री अतुल सावे यांना जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने देण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष अब्दुल सत्तार, नगरसेवक अब्दुल गफ्फार, बाबु खोकेवाला, अजीज कुरेशी, शेख पाशा, शोहेब हुसेन, सत्यपाल सावंत, रफिक बागवान, शेर अली आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)




# विकास कामांना गती देऊन दर्जेदार सेवा तत्परतेने पुरवा -पालकमंत्री अतुल सावे

## महापालिकेच्या १०० दिवस कृती आराखड्याचा घेतला आढावा



शहरातील नागरीकांना दर्जेदार सेवा विहीत वेळेत प्राप्त व्हाव्यात, यासाठी विकासकामांना गती देण्याच्या सुचना देऊन महापालिका राबवित असलेला १०० दिवसांचा कृती आराखडा हा अगदी स्तुत्य उपक्रम असुन शहर विकासाशी संबंधित कामांमध्ये येणाऱ्या काही अडचणी असतील तर त्या सोडवण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन पालकमंत्री अतुल सावे यांनी यावेळी दिले.

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहरातील विकास कामांना गती देऊन शहरातील नागरीकांना मुलभुत नागरी सुविधा तत्परतेने उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत, १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमाचे कौतुक करुन दर्जेदार सेवा वेळेत देणे, डिजिटल क्लासरुम, महिलांसाठी शौचालय, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुतळास्थळी त्यांच्या कविता लावाव्यात, शहर स्वच्छतेसाठी आवश्यकतेनुसार वाहणे व मनुष्यबळामध्ये वाढ करणे, पूर्ण क्षमतेने डोर टू डोर कचऱ्याचे संकलन करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश राज्याचे इतर मागास बहुजण कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले.

शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात महानगरपालिकेच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत महापालिकेच्यावतीने १०० दिवसांचा आराखड्यात विविध कामांमध्ये समावेश असलेल्या कामांचा व पायाभूत सुविधांशी संबंधित मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी महापौर सौ.कविता संतोष मुळे, पालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृह नेते ॲड. महेश कदकदंडे, माजी सभापती किशोर स्वामी, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त अभिजित वायकोस, अजितपालसिंघ संधू, नितीन गाढवे, शहर अभियंता सुमंत पाटील यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

नांदेड शहरातील नागरिकांना १०० दिवसांच्या कृती अराखड्याच्या माध्यमातुन दर्जेदार सेवा ह्या विहीत वेळेत प्राप्त व्हाव्यात ही अपेक्षा व्यक्त करताना या कृती आराखड्याचा पालकमंत्र्यांनी सविस्तर आढावा घेतला. या कृती आराखड्याच्या माध्यमातून होऊ घातलेल्या घरोघरी स्वच्छता, आपत्ती सौम्यीकरण, डीप क्लीनिंग, गोदावरी नदी प्रदुषण मुक्त करणे, पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेतील सुधारणा, अत्याधुनिक गॅस शव दाहिणी, मुख्य चौकातील सुशोभीकरण, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचा पुतळा उभारणे, महिलांसाठी शौचालय उभारणे, अत्याधुनिक वाहतुक व्यवस्था, इलेक्ट्रीक चार्जर स्टेशन, धोकादायक विद्युत वाहीणी भुमिगत करणे, आरटीएस अंतर्गत ७४ सेवा ऑनलाईन इत्यादी उपक्रमांचे पाकमत्र्यांनी कौतुक करुन महापालिकेच्या कामाची प्रशंसा केली.

दरम्यान, बैठकीत महापालिकेच्या विविध विभागांच्या कामाचाही यावेळी आढावा घेण्यात आला. शहरातील प्रस्तावित उड्डान पुले, वाहतुक नियोजन, स्टेडीयम उभारणी, मल्टीपार्कींग, पालिका शाळांचे अद्यावतीकरण आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# चीनची घुसखोरी वृत्ती अंकुशरहित?

एकीकडे अमेरिका-इराण आणि इजराइल-इराण यांच्या युद्धामध्ये दररोज नवनवीन अध्याय लिहिले जात आहेत तर दुसरीकडे जन्मजात असलेली चीनची खोड काही थांबायला तयार नाही. चीनचा वसाहतवाद काही नवीन नाही. वेगवेगळ्या देशांमध्ये घुसून त्यांच्या जमिनीवर अतिक्रमण करण्याची त्याची प्रवृत्ती तशी जुनीच आहे. अगदी महाभारताच्या युद्धामध्ये कौरवांकडून लढण्यासाठी चिनी लोक आले होते. अर्थात त्या काळात तो भारताचाच भाग होता. हा इतिहास अद्यापही अनेकांना माहीत आहे. त्या प्रवृत्तीमध्ये अद्याप मुळीच बदल झालेला नाही. चीनमध्ये जरी बौद्ध धर्माच्या लोकांची संख्या जास्त असली तरी तेथील सरकार मात्र बौद्धांच्या तत्त्वज्ञानाचा कुठेच वापर करीत नसल्याचे वारंवार दिसून येते. त्यांना बुद्ध नको युद्धच पाहिजे. आताही तसेच होते आहे. अमेरिका- इराण यांच्या युद्धामध्ये अप्रत्यक्षरीत्या चीनचा सहभाग आहे. पुढे तो प्रत्यक्ष रूपात येण्याची शक्यता वर्तवली जाते आहे. तसेच तो आपल्या देशामध्ये घुसखोरीचा वारंवार प्रयत्न करीतच असतो, पण सध्या तैवानसारख्या देशाला घशात घालण्याचा त्याचा होत असलेला प्रयत्न म ात्र निश्चितच निंदनीय आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी तैवानबाबत पुन्हा एकदा कठोर भूमिका घेतली आहे. कोणत्याही शक्तीला तैवानला चीनपासून वेगळं ठेवण्याचा अधिकार नाही, असं विधान करत त्यांनी जगभरात तणाव निर्माण केला आहे. गेल्या वर्षी तैवानच्या आसपासच्या हवाई व सागरी हद्दीत चिनी सैन्याने वारंवार घुसखोरी केली, ज्यामुळे चीन आणि तैवान यांच्यात संभाव्य युद्धाची भीती व्यक्त करण्यात आली आहे. सध्याच्या जगातील लढाईसदृश्य परिस्थितीमध्ये चीनच्या ह्या घुसखोरीकडे दुर्लक्ष झाले आहे. तैवानचा मुद्दा दुसऱ्या महायुद्धानंतर चिघळला. चीनमध्ये राष्ट्रवादी आणि कम्युनिस्ट पक्ष यांच्यात यादवी युद्ध झालं. १९४९ साली माओत्से तुंग यांच्या नेतृत्त्वाखाली कम्युनिस्टांनी बीजिंगवर सत्ता स्थापन केली. पराभूत राष्ट्रवादी पक्षाचे नेते तैवानला पळून गेले, तेव्हापासून तैवान स्वतंत्र प्रशासनाखाली आहे. १९७९ मध्ये अमेरिकेने चीनशी करार करत 'वन चायना पॉलिसी' मान्य केली, ज्यामध्ये तैवानला चीनचा भाग मानलं जातं. तरीसुद्धा अमेरिकेने तैवानमध्ये आपलं वर्चस्व कायम ठेवलं आहे. चीनचा कट्टर शत्रू असलेल्या अमेरिकेने तैवानला मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्र पुरवठा केला आणि 'अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ तैवान'ची स्थापना केली. हे इन्स्टिट्यूट तैवानमध्ये अमेरिकन दूतावासासारखं कार्य करतं. चीन तैवानला आपल्या अखत्यारीत आणण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. तैवानवर ताबा मिळवून गुआम आणि हवाई या अमेरिकन सैनिकी तळांच्या आसपासच्या भागावर वर्चस्व निर्माण करण्याचा चीनचा मानस आहे. २००४ मध्ये चीनने फुटिरतावाद विरोधी कायदा मंजूर केला, ज्यात तैवानने वेगळेपणाचा प्रयत्न केल्यास सैनिकी कारवाईची धमकी दिली आहे. १९८० च्या दशकात चीन-तैवानमधील व्यापार, गुंतवणूक आणि पर्यटन यामुळे संबंध सुधारले होते, मात्र २०१६ मध्ये तैवानचे अध्यक्ष त्साई इंग वेन यांच्या नेतृत्वाखाली या संबंधांमध्ये तणाव वाढला. त्साई इंग वेन यांनी चीनच्या विलिनीकरणाच्या प्रस्तावाला स्पष्ट नकार दिला आहे. रशिया या वादात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. अमेरिका तैवानला शस्त्रास्त्र पुरवते, तर रशिया चीनला पाठिंबा देतो. भारताने मात्र तैवानला स्वतंत्र मान्यता दिलेली नाही. चीनने २०२७ पर्यंत तैवानवर ताबा मिळवण्याचा निर्धार केला आहे. चीनच्या तुलनेत तैवानकडे फारच कमी सैनिक आहेत. मात्र, चीनला जागतिक स्तरावर होणाऱ्या परिणामांची जाणीव आहे. चीनची अर्थव्यवस्था निर्यात-आधारित असून, अमेरिकेच्या बाजारपेठेवर ती मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. युद्धाच्या घोषणेने चीनच्या निर्यातीवर परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे चीनची आर्थिक स्थिती अधिक बिघडण्याची शक्यता आहे. सध्या चीनने तैवानच्या चारही बाजूंनी लष्करी तळ वाढवले आहेत आणि मोठ्या प्रमाणावर सैनिक तैनात केले आहेत. मात्र, युद्ध टाळण्यासाठी चीन तैवानला आणि जगाला धमकावण्याचा प्रयत्न करत आहे. तैवान आणि चीनमधील हा तणाव जगभरातील देशांसाठी चिंतेचा विषय आहे. चीनला तैवानवर पूर्णतः ताबा मिळवायचा आहे, पण जागतिक अर्थव्यवस्थेतील त्याची भूमिका, तैवानला मिळणारा आंतरराष्ट्रीय पाठिंबा, आणि चीनच्या स्वतःच्या आर्थिक अडचणी यामुळे चीनला थेट सैनिकी कारवाई करणं कठीण ठरत आहे. त्यामुळे भविष्यातही चीन तैवानवर दबाव आणत राहील, मात्र थेट युद्ध होण्याची शक्यता कमी आहे. चीन आणि तैवानमधील वाढता तणाव केवळ या दोन देशांपुरता मर्यादित राहणार नाही. त्यामुळे जागतिक शांतता राखण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाने यात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता आहे अन्यथा सध्या चालू असलेल्या वेगवेगळ्या देशातील युद्धामध्ये आणखीन एका युद्धाची भर पडेल.

# जिद्दीची उंच भरारी : गौरी गाडगीळ








डाऊन सिंड्रोम किंवा इतर दिव्यांग मुलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन मिश्र स्वरूपाचा असतो. काही ठिकाणी तो अजूनही नकारात्मक आणि मर्यादित आहे, तर काही ठिकाणी तो सकारात्मक आणि समावेशक होत चालला आहे. परंपरागतपणे, अशा मुलांकडे दयेच्या किंवा सहानुभूतीच्या नजरेने पाहिले जाते. अनेकांना वाटते की, ही मुले काही मोठं करू शकत नाहीत किंवा त्यांची क्षमता मर्यादित असते. त्यामुळे त्यांच्या शिक्षण, करिअर किंवा स्वावलंबनाबाबत अपेक्षा खूपच कमी ठेवण्यात येतात. काही वेळा त्यांना ओझं म्हणूनही पाहिले जाते, जे अत्यंत चुकीचे असे आहे.

काही समाजघटकांमध्ये अजूनही अज्ञान आणि गैरसमज मोठ्या प्रमाणावर आढळतात. उदाहरणार्थ, डाऊन सिंड्रोम म्हणजे आजार आहे, तो बरा होऊ शकतो किंवा अशा मुलांना सामान्य जीवन जगता येत नाही. असे चुकीचे समज प्रचलित आहेत. यामुळे या मुलांना मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले जाते. मात्र, गेल्या काही वर्षांत या दृष्टिकोनात हळूहळू बदल होत आहे. शिक्षण, जनजागृती आणि प्रेरणादायी उदाहरणांमुळे लोकांचा विचार अधिक सकारात्मक होत आहे. आता अनेक जण या मुलांकडे क्षमतांच्या दृष्टीने पाहू लागले आहेत. ही मुले काय करू शकत नाहीत? याऐवजी ही मुले काय करू शकतात? हा दृष्टिकोन वाढत आहे.

आज अनेक शाळा आणि संस्था समावेशक शिक्षण (inclusive education) पद्धती स्वीकारत आहेत, जिथे दिव्यांग आणि सामान्य मुले एकत्र शिकतात. यामुळे परस्पर समज, सहानुभूती आणि स्वीकार वाढतो. तसेच क्रीडा, कला, शिक्षण अशा विविध क्षेत्रांत या मुलांनी घेतलेली झेप समाजाचा दृष्टिकोन बदलण्यात मोठी भूमिका बजावत आहेत.

थोडक्यात, अजूनही काही प्रमाणात नकारात्मकता आणि गैरसमज असले, तरी समाज हळूहळू स्वीकार, समज आणि सन्मान या दिशेने पुढे जात आहे. गरज आहे ती अधिक जागरूकतेची आणि संवेदनशीलतेची. जेणेकरून प्रत्येक मुलाला समान संधी आणि सन्मान मिळू शकेल. जिद्द, चिकाटी, योग्य मार्गदर्शन आणि कुटुंबाचा आधार असेल, तर हीच मुले असामान्य यश संपादन करू शकतात. याचं जिवंत उदाहरण म्हणजे पुण्यातील गौरी गाडगीळ. एक अशी तरुणी जिने आपल्या कर्तृत्वाने समाजातील अनेक गैरसमज मोडून काढले आहेत. ते तिच्या कुटुंबाच्या सहाय्याने.

गौरी गाडगीळचा जन्म Down Syndrome या अवस्थेसह झाला. ही स्थिती अनेक शारीरिक आणि बौद्धिक आव्हाने घेऊन येते. त्यामुळे तिचा जीवनप्रवास सुरुवातीपासूनच सोपा नव्हता. लहानपणी तिला सामान्य शाळेतून बाहेर काढण्यात आले, कारण इतर मुलांकडून होणारी चेष्टा आणि अपमान तिला सहन करावा लागत होता. ही परिस्थिती कोणत्याही कुटुंबासाठी खचवणारी असू शकते; मात्र गौरीच्या आयुष्यात तिच्या आईचास्नेहा गाडगीळ यांचाअटळ आधार होता. आईने कधीही हार मानली नाही, उलट आपल्या मुलीच्या क्षमतांवर पूर्ण विश्वास ठेवत तिला पुढे जाण्याची प्रेरणा दिली.

गौरीला लहानपणापासूनच पाण्याची विशेष आवड होती. तिच्या आईने ही आवड ओळखून तिला पोहण्याचे प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. पुढे वॉटर थेरपीमुळे तिच्या शारीरिक आणि मानसिक विकासात लक्षणीय सुधारणा झाली. हळूहळू पोहणं तिच्यासाठी केवळ छंद न राहता तिच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनलं. दररोजच्या कठोर सरावातून तिने आपली कौशल्ये विकसित केली आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर तब्बल ५५ पदके जिंकून आपल्या कर्तृत्वाची ठळक छाप उमटवली. तिच्या या यशामध्ये तिची मेहनत, शिस्त आणि सातत्य स्पष्टपणे दिसून येते. पोहण्याबरोबरच गौरीने अभिनय क्षेत्रातही आपली ओळख निर्माण केली. तिच्या जीवनावर आधारित असलेल्या Yellow या मराठी चित्रपटात तिने स्वतःची भूमिका साकारली. या चित्रपटात आई-मुलीच्या नात्याची भावनिक आणि प्रेरणादायी कहाणी अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आली. गौरीच्या नैसर्गिक आणि हृदयस्पर्शी अभिनयामुळे प्रेक्षक भारावून गेले. तिच्या या भूमिकेसाठी तिला राष्ट्रीय स्तरावर 'स्पेशल ज्यूरी अवॉर्ड' मिळाला, जो तिच्या कलेचा आणि मेहनतीचा मोठा सन्मान आहे. या चित्रपटात तिच्या आईची भूमिका साकारणाऱ्या मृणाल कुलकर्णी यांनीही गौरीच्या जिद्दीचे आणि यशाचे मनापासून कौतुक केले आहे. गौरी केवळ खेळ आणि अभिनयापुरती मर्यादित राहिली नाही, तर शिक्षणातही तिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. पुण्यातील Sir Parashurambhau College (एस. पी. कॉलेज) येथे शिक्षण घेत असताना तिने सायकोलॉजी या विषयात बी. ए. पदवी पूर्ण केली. हा प्रवास तिच्यासाठी सोपा नव्हता. सकाळी कॉलेजचे लेक्चर, दुपारी अभ्यास आणि संध्याकाळी पोहण्याचा सराव असा तिचा कठोर दिनक्रम होता. अनेक वेळा स्पर्धांमुळे तिचे कॉलेज चुकत असे, पण तिच्या शिक्षकांनी तिला अतिरिक्त मार्गदर्शन करून अभ्यासात मागे पडू दिले नाही. तिच्या आईनेही नोट्स सोप्या भाषेत समजावून सांगत तिच्या शिक्षणात महत्त्वाची भूमिका बजावली.

गौरीच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तिची कलात्मक आवड. गेली अनेक वर्षे ती भरतनाट्यम या शास्त्रीय नृत्यप्रकाराचे शिक्षण घेत आहे. पोहण्याचा सराव आणि शिक्षण या दोन्ही गोष्टी सांभाळत तिने नृत्यासाठी वेळ काढला, हे तिच्या शिस्तबद्ध जीवनशैलीचे उत्तम उदाहरण आहे. तिच्या या विविधगुणी व्यक्तिमत्त्वामुळे ती अनेकांसाठी प्रेरणा-स्थान ठरली आहे. आज गौरी गाडगीळ ही केवळ एक यशस्वी जलतरणपटू, अभिनेत्री किंवा विद्यार्थिनी नाही, तर ती समाजातील अनेकांसाठी आशेचा किरण आहे. ती सध्या प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली इतरांना पोहण्याचे कोचिंग देत आहे. भविष्यात मास्टर्स शिक्षण पूर्ण करण्याचे तिचे स्वप्न आहे. तिच्या या प्रवासातून तिचा आत्मविश्वास आणि पुढे जाण्याची जिद्द स्पष्टपणे दिसून येते.

गौरीची कहाणी आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते. अडचणी या कायमस्वरूपी नसतात. त्या फक्त आपल्याला अधिक सक्षम बनवण्यासाठी येतात. योग्य पाठबळ, प्रेम आणि विश्वास मिळाला, तर कोणतीही व्यक्ती आपल्या मर्यादा ओलांडून मोठं यश मिळवू शकते. विशेष मुलांबाबत समाजाने आपला दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. त्यांना दया किंवा सहानुभूतीची नव्हे, तर संधी आणि समजुतीची गरज आहे. आजच्या काळात नवक्षितिज, उम्मीद यांसारख्या संस्था विशेष मुलांसाठी महत्त्वपूर्ण काम करत आहेत. मात्र, केवळ संस्थांवर अवलंबून न राहता प्रत्येकाने आपल्या पातळीवर संवेदनशील होणे आवश्यक आहे.

घर, शाळा आणि समाज या तिन्ही स्तरांवर या मुलांना प्रोत्साहन दिले, तर त्यांच्यातील क्षमता उजळून निघू शकते. गौरी गाडगीळचा प्रवास हा मनाच्या विजयाची प्रेरणादायी गाथा आहे. तिच्या जिद्दीने आणि आत्मविश्वासाने तिने समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे. तिची कहाणी आपल्याला शिकवते की, स्वप्न पाहण्याचा आणि ते पूर्ण करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. फक्त त्यासाठी लागते ती अटळ जिद्द, अथक परिश्रम आणि न संपणारा आत्मविश्वास.

**-डॉ. दीपाली पांडे देशमुख**
पू. अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय
राणी सावरगाव

# सर्व काही प्रमाणात असावे



'अति तिथं माती' ही म्हण जगातल्या प्रत्येक माणसाला माहीत आहे. कोणतीही बाब योग्य प्रमाणातच असली पाहिजे. अगदी अत्यंत चांगल्या गोष्टीनेसुद्धा प्रमाण ओलांडले तर ती गोष्ट चांगली राहत नाही, आणि एखादी वाईट वाटणारी गोष्टसुद्धा प्रमाणात असेल तर ती वाईट ठरत नाही. म्हणूनच जगात अशा अनेक बाबी आहेत ज्यांना विष मानले आहे तरीसुद्धा त्या जीवनात प्रमाणामध्ये असाव्या लागतात. उदाहरणच द्यायचे झाले तर नित्याच्या जेवणामध्ये असणाऱ्या मिठाला आणि साखरेला संशोधना नुसार विषच मानावे लागेल. पण तरीसुद्धा यांचे जेवणात आणि जीवनात किती महत्त्वाचे स्थान आहे हे आपण सर्वजण जाणतोच. मिठाशिवाय जेवणाला चवच नाही. या उलट अनेक वस्तू अमृतासारख्या आहेत. तरीसुद्धा त्या प्रमाणाबाहेर सेवन केल्या तर त्या विषच ठरतात. ही गोष्ट केवळ खाण्याच्या बाबी संदर्भातच नाही. तर ती जीवनातील प्रत्येक बाबीला लागू पडते. म्हणून आम्ही नेहमी ऐकत आलोय 'प्रमाणामध्ये सर्व काही असावे...' या वरील एक सुंदर कविता मला आठवते.

अति कोपता कार्य जाते लयाला
अति नम्रता पात्र होते भयाला
अति काम ते कोणतेही नसावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे...
अति भूषणे मार्ग तो संकटाचा
अति थाट तो वेश होतो नटाचा
राहावे असे की न कोणी हसावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे...
स्तुतीला अति बोलती ती श्वानवृत्ती
अति लोक निंदा करी दृष्ट चित्ती
न कोणा उगे शब्द स्पर्शे डसावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे...
जुन्या चे अति भक्त ते हटवादी
नव्याचे अति लाडके ते शुद्ध नादी
खरे सार शोधुनिया नित्य घ्यावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे...

ही कविता वाचल्यावर स्पष्टपणे समजते की कुठलीही गोष्ट प्रमाणापेक्षा जास्त झाल्यास ती वाईट असते. मुळात ज्या गोष्टी वाईट आहेत त्या अजिबातच नसाव्यात. पण चांगल्या गोष्टींचा सुद्धा अतिरेक होऊ नये. उदाहरणच द्यायचे झाले तर...इतरांना मदत करणे, वेळोवेळी सहकार्य करणे ही चांगली बाब आहे. पण ती सुद्धा योग्य मर्यादेत असली पाहिजे. स्वतःच्या आणि स्वतःच्या कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी सक्षम नसणाऱ्या माणसांनी सतत परोपकाराच्या नावाखाली...आणि माणुसकीच्या लेबलाखाली सतत काही व्यक्तींना मोठ्या प्रमाणात आणि आवाक्याबाहेर केलेली मदत कायमस्वरूपी प्रश्नच निर्माण करते. सतत स्वतःच्या आणि स्वतःच्या कुटुंबाच्या गरजा भागवण्यापेक्षा...स्वतःचे आणि कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करण्यापेक्षा...तुम्ही जर काही विशिष्ट माणसांना आवाक्याबाहेरची मदत करत असाल तर हे व्यावहारिक जग तुम्ही कोणीही असाल तरीसुद्धा तुम्हाला नक्की प्रश्न विचारेल. असे का...? आणि असे करण्यामागचा नेमका हेतू काय...? हे सर्वांनाच ज्ञात आहे. तरीसुद्धा माणसे आयुष्यभर प्रमाण सांभाळत नाहीत. अक्षरशः वाहवत जातात. परोपकार आणि चांगुलपणा याचा अतिरेक करतात...

तार्किक विचार केला तर तुम्ही जर एखाद्या व्यक्तीशी अति प्रमाणात चांगले..... अतीव सहकार्याचे...वागत असाल तर बघणाऱ्यांना याच्याही पुढे जाऊन प्रत्यक्ष ज्या व्यक्तीशी चांगले वागत आहात अगदी त्यालासुद्धा नक्कीच प्रश्न पडतो. असे का...? मुळात तुम्ही कितीही चांगले असलात. तरी तुमचा चांगले-वाईटपणा हा तुमच्या मनाच्या निरागसते वरून ठरत नाही तो ठरतो तुमच्या वागण्यावरून. म्हणून किमान स्वतःसाठी नाही तर जगासाठी तरी प्रमाण सोडायचे नसते. कधीकधी चांगल्या गोष्टी सुद्धा प्रमाणापेक्षा जास्त झाल्या तर त्याचेही व्यसन लागते आणि त्याची सुद्धा नशा यायला लागते. बरीच माणसे परोपकार आणि चांगुलपणाच्या नशेत जगतात... संपूर्ण आयुष्य या नशेमध्ये वाहवत जातात... हे सगळे करताना आपल्या अत्यंत जवळच्या माणसांना दुखावतात... कळत-नकळत त्यांच्यापासून दूर जायला लागतात. एक दिवस बऱ्याच मोठ्या वाईट अनुभवानंतर चांगुलपणाची नशा उतरते, आणि त्यावेळी मात्र काहीच शिल्लक उरलेले नसते. आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्यागरजा पूर्ण झाल्यानंतर जमेल तेवढी गरजूंना मदत ही सर्वसामान्य पद्धत आहे. मुळात आपले आणि आपल्या कुटुंबाचे हित साधन्यापूर्वीच इतरांना आवाक्याबाहेर असणारी मदत करणे सुद्धा एका दृष्टीने आपल्या कुटुंबावर झालेला अन्याय असतो.

याच्याही पुढचा विचार म्हणजे प्रत्येकाने आपल्या आयुष्यात आपल्याला जमेल तेवढे कष्ट...जमेल तेवढे कार्य... आणि जमेल तेवढेच कर्तुत्व करण्याचा प्रयत्न करावा. काम करण्याचा... कष्ट करण्याचा...आणि पैसा कमावण्याचा सुद्धा अतिरेक होता कामा नये. अर्थार्जनाचे सुद्धा व्यसन लागता कामा नये.

आपले आणि आपल्या कुटुंबाचे जीवन घडवताना अती धावपळ करणे सुद्धा व्यर्थ आहे. मुळात क्षणभंगुर असणाऱ्या जीवनासाठी अफाट धावपळ करून बिनभरवश्याची गुंतवणूक कशासाठी....? मुळात जीवन तुम्हाला गुंतवणूक मागत नाही. या जीवनाला खऱ्या अर्थाने सोडवणुकीचे गरज असते. गोष्टी समजून साध्या, सोप्या, सरळ करता आल्या पाहिजेत. अत्यंत साधेपणाने आणि मोकळ्या वातावरणात जगता आले पाहिजे. शेवटी रिकाम्या हाताने आलेला माणूस रिकाम्या हातानेच परत जातो. मग आयुष्यभराची ही सगळी ओढाताण कशासाठी..? याचा अर्थ असा नाही की माणसाने कष्ट करू नयेत.... काम करू नये.... प्रयत्न करू नयेत...याउलट माणसाने सतत क्रियाशील रहावे. यात शंकाच नाही पण कुठलीही धावपळ आणि कष्ट आपल्या जिवापेक्षा आणि जीवनापेक्षा महत्त्वाचे नाहीत. कोणतेच काम आपल्या जिवापेक्षा मोठे नाही. तुम्ही कितीही उदात्त समाजहिताचे आणि विश्वकल्याणाचे काम करत असलात तरीसुद्धा ते कामकरण्यासाठी तुमचे आरोग्य चांगले राहणे गरजेचे आहे. म्हणून प्रमाणापेक्षा जास्त धावपळ केल्याने आजारी पडाल आणि करत असलेले ध्येयवेडे उदात्त कार्य थांबेल. म्हणून कार्य चालू राहण्यासाठी तरी प्रमाणात धावपळ करा. त्यामुळे थोडक्यात काय तर अति सर्वत्र वर्जयेत म्हणतात ते या अर्थाने.

**-मयूर मधुकरराव जोशी**
'विठ्ठल-रुक्मिणी' नगर, जिंतूर
मो. ७९७२३४४१२८
९७६७७३३५६०

# सोशल मीडियावरही आयपीएलचा फिव्हर!

आयपीएल अर्थात इंडियन प्रीमियर लीगचे हे एकोणिसावे वर्षे आहे. सलग एकोणीस वर्षे आपली लोकप्रियता टिकवून ठेवणारी आयपीएल ही जगातील एकमेव क्रिकेट लीग आहे. गेली अठरा वर्षे केवळ भारतातीलच नाही तर जगातील सर्वाधिक लोकप्रिय क्रिकेट लीग म्हणून आयपीएलकडे पाहिले जाते. जगभरातील अनेक दिग्गज खेळाडू या लीगमध्ये सहभागी होतात. मुळातच क्रिकेटला एका धर्माचे स्थान असलेल्या आपल्या देशात आयपीएल सुरू असल्याने सहभागी संघाचे फॅन फॉलोअर्सची संख्या देखील खूप मोठी आहे. आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी त्या त्या संघाचे चाहते मैदानावर गर्दी करताना दिसतात. आयपीएलचा सामना कोणत्याही मैदानावर, कोणत्याही शहरांमध्ये असो क्रिकेट रसिकांच्या उदंड प्रतिसादामुळे मैदाने तुडुंब भरली असल्याचे चित्र आपण दरवर्षीच पाहतो. मात्र यावर्षी मैदानासोबतच मैदानाबाहेरही आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी चाहत्यांमध्ये स्पर्धा लागली आहे.

आजचे युग सोशल मीडियाचे युग आहे. सोशल मीडियाचा वापर न करणारा क्रिकेट चाहता शोधूनही सापडणार नाही. आयपीएलमध्ये सहभागी असणाऱ्या सर्वच्या सर्व म्हणजे दहाच्या दहा संघाचे स्वतंत्र सोशल मीडिया अकाउंट आहेत. प्रत्येक संघाला फेसबुक, इन्स्टाग्राम व ट्विटरवर फॉलो करणारे करोडो फॉलोअर्स आहेत. हे फॉलोअर्स विविध सोशल मीडिया साइटवरून आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करत असतात. आयपीएलची मॅच चालू असताना ट्विट्स, पोस्ट, व्हीडीओज आणि मिम्सचा अक्षरशः पाऊस पडतो. सेकंदाला हजारो ट्विट्स, पोस्ट आणि व्हीडीओज येत असतात. जो तो आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी ट्विट आणि पोस्ट करत असतात. या सर्वांमध्ये मुंबई इंडियन्सचे फॅन फॉलोअर्स सर्वात जास्त आहेत. ट्विटर, फेसबुक आणि इन्स्टाग्राम प्रमाणेच व्हाट्सएपवर देखील चाहते आपल्या संघाला सपोर्ट करीत असतात.

आपल्या आवडत्या संघाची मॅच असेल तर चाहते आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी व्हाट्सएपवर स्टेटस ठेवतात. सध्या सोशल मीडियाचं चित्र पाहिलं तर मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग व आरसीबी अर्थात रॉयल चॅलेंजर्स



बंगळुरू या तीन संघांना सोशल मीडियावर चाहत्यांचा सर्वात जास्त सपोर्ट मिळताना दिसत आहे. खेळाडूंमध्ये सर्वात जास्त सपोर्ट रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबीचा माजी कर्णधार विराट कोहली याला मिळत आहे. आंतरराष्ट्रीय टी २० क्रिकेटमधून निवृत्त झाला तरी विराटची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे हे सोशल मीडियावरुन लक्षात येते. मागील वर्षी चेन्नई सुपर किंग्जच्या महेंद्रसिंग धोनी याला सोशल मीडियावरून सर्वाधिक सपोर्ट मिळाला होता.

यावर्षी दुखापतीमुळे तो अद्याप एकही सामना खेळू शकला नाही पण तो जेव्हा मैदानात उतरेल तेव्हा चाहतेही मीडियावर कल्ला करतील यात शंका नाही. विराट कोहली आणि धोनी सारखे जेष्ठ खेळाडूंनाच नाही तर नवख्या खेळाडूंनाही चाहते सपोर्ट करत आहेत. राजस्थान रॉयल्स संघाचा १५ वर्षीय युवा खेळाडू वैभव सूर्यवंशी हा आपल्या धडाकेबाज फलंदाजीने चांगलाच झोतात आला आहे. मैदानाप्रमाणेच तो सोशल मीडियावर देखील झोतात आहे. सोशल मीडियावरून त्याचे कौतुक करताना चाहते थकत नाही. हे झाले खेळाडूंबाबत. संघाच्या बाबतीत विचार करायचा झाला तर आरसबीच्या संघाला सर्वाधिक सपोर्ट मिळत आहे. आरसीबीच्या सामन्याला प्रेक्षकांचा सर्वाधिक प्रतिसाद मिळत आहे. टीव्ही असो की मोबाईल सर्वाधिक पाहिले जाणारे सामने हे आरसीबीचेच असतात.

आरसीबीप्रमाणे मुंबई इंडियन्स, राजस्थान रॉयल्स, पंजाब आणि हैद्राबाद या संघांच्या सामन्याला देखील मोठा प्रतिसाद मिळताना दिसतो. यावर्षीची आयपीएल कोणता संघ जिंकणार यावर चाहत्यांमध्ये पैजा लागत आहेत. मॅच संपल्यानंतर मॅचवर आधारित तसेच प्रतिस्पर्धी संघाच्या खेळाडूंच्या खिल्ली उडवणाऱ्या मजेशीर मिम्स बनवून व्हायरल केल्या जात आहे. हे मिम्स बोलके असतात. यातून करमणूक तर होतेच पण संघाची सद्यस्थिती काय आहे हे देखील समजते. चेन्नई, मुंबई आणि कोलकाता हे संघ पॉइंट टेबलमध्ये तळाशी आहेत. पाच वेळेचा विजेता मुंबई फक्त एक सामना जिंकू शकला तर तीन वेळेचा विजेता कोलकाता अद्याप एकही सामना जिंकू शकला नाही. चेन्नईनेही पाच वेळा विजेतपद मिळवले असले तर त्यांनाही अद्याप सूर गवसलेला नाही त्यामुळे या तीन संघाची आणि त्यांच्या खेळाडूंची सोशल मीडियावर चांगलीच खिल्ली उडवली जात आहे. चाहते सोशल मिडियावर मजेशीर मिम्स, मेसेज करत आपल्या संघाला सपोर्ट करतानाच प्रतिस्पर्धी संघाची खिल्ली उडवून आयपीएलचा फिव्हर आणखी वाढवत आहे. एकूणच केवळ मैदानावरच नव्हे सोशल मीडियावर देखील आयपीएलचा फिव्हर वाढल्याचे दिसत आहे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# महात्मा फुलेंचा वारसा केवळ रक्ताचा नाही तर विचारांचा; सुशिक्षित वर्गाने आत्मचिंतन करण्याची गरज -हेरंब कुलकर्णी

**नांदेड (प्रतिनिधी)**– 'आपल्याला आपल्या तीन पिढ्यांपूर्वीच्या पूर्वजांची नावे कदाचित ठाऊक नसतील, मात्र २०० वर्षांनंतरही महात्मा फुले यांच्याबद्दल संपूर्ण देशाला आकर्षण वाटते. हे नातं केवळ जैविक नसून ते विचारांचे आहे,' असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत हेरंब कुलकर्णी यांनी केले. मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेड आणि आयआयबी यांच्या विद्यमाने क्रांतिसूर्य महात्मा जोतीबा फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. १५ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता अशोक नगर येथे झालेल्या या कार्यक्रमात 'महात्मा फुले' या विषयावर कुलकर्णी बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, महात्मा फुले यांनी शिक्षण, शेती, उद्योग आणि भारतीय परंपरेची चिकित्सा अशा सर्वच क्षेत्रांत मूलभूत कार्य केले आहे. ते केवळ विचारवंतच नव्हे तर प्रयोगशील शेतकरी आणि उद्योजकही होते. आज बहुजन समाजातील सुशिक्षित मध्यमवर्ग स्वतः च्या मुळांपासून तुटून पुन्हा कर्मकांडांच्या



आहारी जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. हे चक्र तोडण्यासाठी सुशिक्षितांनी आपल्या भौतिक आकांक्षांना मर्यादा घालून समाजातील वंचित घटकांसाठी काम करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

फुले यांच्या द्विशताब्दी वर्षात सुशिक्षित वर्गातील विद्रोही भान पुन्हा जागृत करणे, हाच खरा आजचा प्रश्न आहे. जर आपण हे करू शकलो नाही, तर वाढती धनशक्ती आणि जातीय वास्तव वंचितांचे जगणे अधिक कठीण करेल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी हेरंब कुलकर्णी यांचे स्वागत 'मसाप' चे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य देवीदास फुलारी आणि आयआयबीचे संचालक दशरथ पाटील यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन सहकार्यवाह राम तरटे यांनी केले, तर आभार कोषाध्यक्ष व्यंकटेश चौधरी यांनी मानले. या व्याख्यानाला माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, शेतकरी संघटनेचे गुणवंत पाटील हंगरगेकर, प्रा. बालाजी कोंपलवार, निळकंठ पाचंगे, दिगू तुमवाड, दिलीप शिंदे, डॉ. विलास ढवळे, शिवा कांबळे, सुरेश दंडवते, अंकुश खानसोळे, गोविंद मुंडकर, रवींद्र पांडागळे, उमेश पांचाळ, मिलिंद जाधव, मनोहर बसवंते, सुनील मुत्तेपवार, यांच्यासह शहरातील नागरिक आणि विचारवंत उपस्थित होते.

महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या अफाट कार्याची माहिती गावागावांत पोहचविण्यासाठी राज्यभर दोन हजार व्याख्यान देण्यासाठी सध्या हेरंब कुलकर्णी हे गावोगाव फिरत आहेत. पाठ्यपुस्तकात फुलेंविषयी म जकूर कमी होत गेल्याने व मध्ये बराच काळ फुलेंविषयी तपशीलवार माहिती नव्या पिढीला व्हावी म्हणून त्यांनी ६८ पानांची पीडीएफ बनवली आहे. त्यासाठी ३ महिने त्यांनी वाचन केले. यात फुलेंचे चरित्र, त्यांचे महिला प्रश्नांवर, शिक्षणावर विचार, विधवांसाठी केलेले काम, पुरोहितशाही, धार्मिक कर्मकांड यावर फ ुलेंचे विश्लेषण, शेतीविषयक चिंतन त्यावर केलेले काम, फुलेंनी लिहिलेल्या पुस्तकांचा परिचय असे सविस्तर तपशील त्यांनी दिले आहेत. त्याचबरोबर आजचे शिक्षणाचे प्रश्न, आजचे शेतीचे प्रश्न, आजचे पुरोहितशाही आव्हान आज एकल महिलांचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न याविषयी सुद्धा मुद्दे दिले आहेत. इतरांनी ती पिडिएफ वाचून किमान ५ व्याख्याने द्यावीत, असे आवाहन देखील हेरंब कुलकर्णी यांनी केले आहे.

कुलकर्णी पुढे म्हणाले की, देशातील सुमारे ७० जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बालविवाह होत असून, त्यापैकी १७ जिल्हे महाराष्ट्रातील आहेत. विशेष म्हणजे या १७ जिल्ह्यांपैकी संपूर्ण भारतात मराठवाडा कोणत्या क्षेत्रात अग्रेसर आहे हे ठामपणे सांगता येणार नाही; मात्र बालविवाहाच्या बाबतीत मराठवाडा देशात अव्वल स्थानी असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत हेरंब कुलकर्णी यांनी केले.

# शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत विविध क्रीडा प्रबोधीनीमध्ये सरळ व खेळनिहाय कौशल्य चाचणीद्वारे सन २०२६-२७ करिता प्रवेश

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याकरिता राज्यात प्रतिभावंत खेळाडूंची निवड करुन शास्त्रोक्त प्रशिक्षण, शिक्षण, भोजन, निवास, अद्ययावत क्रीडा सुविधा, क्रीडा प्रबोधीनीच्या अंतर्गत खेळाडूंना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्यातून जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी राज्यातील प्रतिभावान खेळाडूंची निवड करुन त्यांना शास्त्रोक्त प्रशिक्षण, संतुलित आहार व अद्ययावत क्रीडा सुविधा पुरवून त्यासाठी सुसंघटित प्रयत्न करण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शिवछत्रपती क्रीडापीठ, म्हाळुंगे बालेवाडी, पुणे अंतर्गत राज्यात विविध क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत.

सन २०२६-२७ साठी शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत सदर ०६ क्रीडा प्रबोधिनीत सरळप्रवेश (५०%) व कौशल्य चाचणी (५०%) प्रक्रियेअंतर्गत खालील निकषानुसार निवासी व अनिवासी प्रवेश देण्यात येणार आहेत. सदर प्रवेश प्रक्रियासाठी खालीलप्रमाणे नियम अटी व शर्ती राहणार आहेत.

राज्यात पुणे, कोल्हापूर, ठाणे, अमरावती, अकोला, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, गडचिरोली अशा ९ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली होती. सदर ठिकाणी क्रीडा प्रबोधिनीमध्ये क्रीडा प्रशिक्षणार्थीची निवड करण्यासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

ज्युदो, जिम्नॅस्टीक्स, हॉकी, शुटींग, फुटबॉल, जलतरण, अॅथलेटिक्स, कुस्ती, बॅडमिंटन, आर्चरी, हॅन्डबॉल, टेबलटेनिस, वेटलिफटींग, ट्रायथलॉन, सायकलिंग, बॉक्सींग अशा १६ क्रीडा प्रकारात प्रशिक्षण देण्यात येते.

सरळ प्रवेश प्रक्रिया क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले खेळाडू किंवा राष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनिधीत्व केलेले खेळाडू ज्यांचे वय १९ वर्षआतील आहे अशा खेळाडूंना संबंधित खेळाबाबतची चाचणी तज्ज्ञ समिती समक्ष देऊन प्रवेश निश्चित केला जातो. तथापी सरळ प्रवेश प्रक्रियेमध्ये जर इच्छुकांची संख्या ५०% पेक्षा जास्त असल्यास प्रथम प्राधान्य सरळ प्रवेश अंतर्गत पात्र होणाऱ्या निवासी व अनिवासी खेळाडूंना राहील.

खेळनिहाय कौशल्य चाचणी क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर सहभागी खेळाडूंना ज्यांचे वय १९ वर्षे आतील आहे अशा खेळाडूंना संबंधित खेळाच्या खेळनिहाय कौशल्य चाचणीचे आयोजन करुन गुणानुक्रमे प्रवेश निश्चित केला जाईल.

खेलो इंडिया राज्य निपुणता केंद्र, पुणे- अॅथलेटिक्स, सायकलींग, शुटींग खेळात ज्यांचे वय २० वर्षे आतील आहे अशा खेळाडूंना संबंधित खेळाबाबतची कोशल्य चाचणी तज्ज्ञ समिती समक्ष देऊन प्रवेश निश्चित केला जातो.

वैदयकीय चाचणी उपरोक्त चाचण्यांमध्ये निवड झालेल्या खेळाडूंची वैद्यकीय पथकाद्वारे चाचणी घेऊन क्रीडा प्रबोधिनीमध्ये शारीरिकदृष्ट्या सुदृढ खेळाडूंची निवड अंतिम करण्यात येत आहे.

जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर चाचण्या आयोजित करताना करावयाची कार्यवाही- अ) जिल्हास्तर

१) आपल्या शाळेच्या/संस्थेच्या/संघटनेच्या वतीने जिल्हा, विभाग व राज्य क्रीडा प्रबोधिनी चाचण्यांबाबत माहिती सर्वांना अवगत करण्यात यावी. २) जिल्हास्तरावर क्रीडा प्रबोधिनी विभाग चाचणीसाठी सहभागी होणाऱ्या खेळाडूंची नांवे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, इनडोअर हॉल, नांदेड येथे नोंदणी करण्यात यावी. खेळाडूंचे नांव, जिल्हा, खेळप्रकार, जन्मदिनांक, वय व क्रीडा कामगिरी प्रमाणपत्र याबाबत माहिती संकलित करुन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांचेकडे दि.२२ एप्रिल,२०२६ पर्यंत सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री गुरु गोबिंदसिंघजी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत महिलांसाठी प्रवेशाची सुवर्णसंधी

**नांदेड (प्रतिनिधी)** – महिलांच्या कौशल्यविकासाला चालना देत त्यांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने श्री गुरुगोबिंदसिंघजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), नांदेड येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, महिलांसाठी रोजगारा-भिमुख अभ्यासक्रमांवर अधिक भर देत विविध सवलती व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

संस्थेमार्फत महिलांसाठी कॉस्मेटोलॉजी आणि शिवणकाम तंत्रज्ञान या दोन प्रमुख अभ्यास-क्रमांची सोय करण्यात आली आहे. कॉस्मेटोलॉजी व्यवसायासाठी २४ तर शिवणकाम तंत्रज्ञानासाठी ४० अशा एकूण ६४ जागा केवळ म हिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. हे दोन्ही अभ्यासक्रम अल्प कालावधीत कौशल्य आत्मसात करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे ठरत आहेत.

याशिवाय, संस्थेतील इतर तांत्रिक अभ्यासक्रमांमध्येही महिलांसाठी ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या असून, त्यामुळे पारंपरिक क्षेत्रांबरोबरच तांत्रिक क्षेत्रातही महिलांना प्रवेश मिळणार आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उपलब्ध असलेले विविध कोर्सेस उद्योगाभिमुख असल्याने प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची, लघुउद्योग उभारण्याची किंवा नोकरीच्या संधी मिळविण्याची मोठी संधी प्राप्त होते.

संस्थेमध्ये अत्याधुनिक यंत्रसामग्री, सुसज्ज कार्यशाळा आणि अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रात्यक्षिक शिक्षण दिले जाते. त्यामुळे विद्यार्थिनींना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळून त्यांचा आत्मविश्वास वाढतो. तसेच, अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विविध सरकारी योजनांचा लाभ घेऊन स्वतःचा उद्योग उभारण्यासाठीही मार्गदर्शन करण्यात येते.

आजच्या बदलत्या आणि स्पर्धात्मक युगात कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेता, महिलांनी शिक्षणासोबतच कौशल्य विकासाकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर जास्तीत जास्त महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेमार्फत करण्यात आले आहे.

# स्वयंचलित ब्लॉक प्रणालीच्या कामांमुळे काही गाड्यांचे तात्पुरते नियम

**नांदेड (प्रतिनिधी)**– मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागामार्फत पारस गैगाव अकोला विभागात अप व डाऊन दोन्ही मार्गांवर स्वयंचलित ब्लॉक प्रणाली बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या पायाभूत सुविधांच्या कामांच्या पार्श्व-भूमीवर भुसावळ, बडनेरा विभागात काही गाड्यांचे तात्पुरते नियमन करण्यात येणार आहे.

दि. २३ एप्रिल रोजी सुटणारी गाडी क्र. १२४८५ नांदेड श्रीगंगानगर एक्सप्रेस ही गाडी काटेपुर्णा शेगाव विभागात २ तास नियमन करण्यात येईल.

दि. २३ एप्रिल रोजी सुटणारी गाडी क्र. २२७२३ नांदेड श्रीगंगानगर एक्सप्रेस ही गाडी अकोला येथे क्रॉसिंगमुळे सुमारे ३० मिनिटे नियमन करण्यात येईल.

दि. २२ एप्रिल रोजी सुटणारी गाडी क्र. १७६०५ काचीगुडा भगत की कोठी एक्सप्रेस ही गाडी अकोला येथे क्रॉसिंग-मुळे सुमारे ३० मिनिटे नियमन करण्यात येईल. दि. २२ एप्रिल रोजी सुटणारी गाडी क्र. १२७१९ जयपूर हैदराबाद एक्सप्रेस ही गाडी अकोला येथे क्रॉसिंगमुळे सुमारे ३० मिनिटे नियमन करण्यात येईल.

प्रवाशांनी या तात्पुरत्या बदलांची नोंद घ्यावी व त्यानुसार प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासना-तर्फे करण्यात आले आहे. या कामांदरम्यान होणाऱ्या गैरसोयीबद्दल रेल्वे प्रशासन दिलगीर आहे.

# आठ दिवसांत ११९ सराईत गुन्हेगारांवर कारवाई; कोम्बिंग ऑपरेशनद्वारे गुन्हेगारीवर वचक

**नांदेड (प्रतिनिधी)** –दर महिन्यात पोलीस दलाच्या वतीने दोन वेळेस होणारे कोंबिंग ऑपरेशन आता दररोज होत असून, त्यामुळे गुन्हेगारीवर वचक निर्माण झाला आहे. ८ दिवसांत या ऑपरेशनमुळे एकूण ११९ सराईत गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आली आहे.

शहरात ३ दिवसांमध्ये ५ खून प्रकरणाची मालिका घडली होती. त्यामुळे पोलीस दल अधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टिकोनातून जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ६ एप्रिलपासून दररोज कोबिंग ऑपरेशन सुरू केले आहे. हे ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत होत असून त्याद्वारे शहरातील सराईत गुन्हेगारांची तपासणी करण्यात येत आहे.

यावेळी नाकाबंदी करण्यात येते व रात्रभर सराईत गुन्हेगारांच्या घरी जाऊन त्यांची तपासणी करून छायाचित्र घेण्यात येते. तो सराईत गुन्हेगार घरी आढळला नाही तर त्याच्या विरोधात कारवाई करण्यात येते. तसेच हद्दपार व तडीपार केलेले गुन्हेगार शहरात आढळले तर त्यांच्यावरही कारवाई



करण्यात येते. या ऑपरेशनमध्ये अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, भोकरच्या अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी शहर, इतवारा, कंधार, बिलोली, देगलूर, माहूर, प्रशिक्षणार्थी उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, अधिकारी, अंमलदार तसेच शहरातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार, कुंटूर, रामतीर्थ, सोनखेड, उस्माननगर, लिंबगावचे प्रभारी अधिकारी यांचा समावेश होता.



**हदगाव** – येथील काँग्रेसचे नगरसेवक अजय सूर्यवंशी यांनी थेट दिल्ली गाठत राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी विविध विकासकामांविषयी चर्चा केली.

# देगलूर रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी २२.९७ कोटी रूपयांची प्रशासकीय मंजुरी -खा. डॉ. अजित गोपछडे

**नांदेड (प्रतिनिधी)** –देगलूर येथील श्रेणीवर्धित १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी तब्बल २२ कोटी ९७ लक्ष रुपयांच्या निधीस प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याम ुळे हा आरोग्य सेवेचा महत्त्वाचा विषय मार्गी लागला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पास मंजुरी दिल्याने नांदेड जिल्ह्याच्या आरोग्य सेवेत मोठी भर पडणार असल्याचे बोलले जात आहे.

कर्नाटक व तेलंगणा राज्यांच्या सीम ेजवळ वसलेला देगलूर तालुका हा व्यापार, सामाजिक आणि भौगोलिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. नांदेडनंतर मोठे शहर म्हणून ओळख असलेल्या देगलूरम



ध्ये मोठ्या प्रमाणावर रुग्ण उपचारासाठी येत असतात. मात्र, अद्ययावत वैद्यकीय सुविधांच्या अभावामुळे रुग्णांना नांदेड किंवा इतर शहरांकडे जावे लागत होते.

या पार्श्वभूमीवर १०० खाटांच्या श्रेणीवर्धित रुग्णालयाच्या इमारत बांधकाम ासाठी निधी मंजुरी मिळाल्याने स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. नव्या इमारतीमुळे आपत्कालीन सेवा, तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता आणि आधुनिक आरोग्य सुविधा स्थानिक पातळीवरच उपलब्ध होणार असून सीम ावर्ती भागातील हजारो नागरिकांना याचा थेट लाभ होईल.

या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे खासदार डॉ. अजित गोपछडे यांचे योगदान विशेष उल्लेखनीय ठरले आहे. मंत्रालयीन स्तरावर बैठका, पत्रव्यवहार आणि संबंधित विभागांशी समन्वय साधत त्यांनी हा प्रकल्प मार्गी लावला. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाल्याने देगलूरच्या विकासाला नवी गती मिळाली आहे.

राज्यसीमेवरील आरोग्याची निकड पाहता देगलूरमध्ये आता उपचारांचा नवा अध्याय सुरू होणार आहे. हा निर्णय सीम ावर्ती भागासाठी आरोग्यसेवेचा मैलाचा दगड ठरणार आहे.

# जिल्ह्यात सन २०२५ च्या तुलनेत २०२६ मध्ये अपघातात घट

**नांदेड (प्रतिनिधी)**– परिवहन विभागाने राबविलेल्या विविध उपाययोजनांचा सकारा-त्मक परिणाम दिसून येत आहे. जिल्ह्यात रस्ते अपघात आणि मृत्यूच्या संख्येत घट झाली आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाद्वारे अतिवेगाने आणि मद्यपान करुन वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्यात येत आहे. आरटीओ कार्यालयाच्या इंटरसेप्टर वाहनांवरील रडार कॅमेऱ्याद्वारे रस्त्यावरून भरधाव जाणाऱ्या, सिटबेल्ट न लावलेल्या, ट्रीपल सीट व हेल्मेट नसलेल्या वाहन चालकांवर कारवाई करण्यात येत आहे.

जिल्ह्यात एकूण झालेल्या अपघातांपैकी सर्वाधिक अपघात हे सायंकाळी ६ ते रात्री ९ च्या दरम्यान झाले आहेत. अपघात कमी करण्यासाठी सुक्ष्म पद्धतीने तालुकानिहाय विश्लेषण करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या एकूण ३२ अधिकाऱ्यांद्वारे फेब्रुवारी २०२५ ते मार्च २०२५ या दोन महिन्याच्या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांचे तालुकानिहाय सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात Geo Tagging करून अपघात स्थळांची पाहणी करण्यात आली. अपघातांची कारणे जाणून अपघातांची संख्या कमी करण्याच्यादृष्टीने तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी त्या-त्या तालुक्यांचा उपाययोजनेसह सादर केलेला अहवाल जिल्हाधिकारी तथा जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांना सादर करण्यात आला.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त बुद्ध विहार परिसरात स्वच्छता अभियान, आरोग्य तपासणी व मिरवणूक

**भोकर (प्रतिनिधी)**– भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून भोकर शहरात विविध सामाजिक आणि विधायक उपक्रम राबविण्यात आले. 'स्वच्छता हीच सेवा' हा मंत्र जपत राबविलेली स्वच्छता मोहीम, कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी आणि शांततामय वातावरणात मिरवणूक निघाली.

सोमवार, दि. १३ एप्रिल रोजी शहरातील पंचशीलनगर येथील तक्षशीला बुद्ध विहार व परिसरात नगर परिषद, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह आणि पंचशील नगर भीम जयंती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, केवळ परिसर स्वच्छ करून न थांबता शहराला चकाकी देणाऱ्या 'स्वच्छतादूतांच्या' (कर्मचाऱ्यांच्या) आरोग्याची विशेष काळजी घेण्यात आली. यावेळी उपस्थित स्वच्छता कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. याकामी मोलाचे सहकार्य करणाऱ्या शहरी आरोग्य वर्धिनी केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. अंकिता केंद्रे यांचा नगर परिषद व भीम जयंती मंडळाच्या वतीने भारतीय संविधानाची 'उद्देशिका' देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

१४ एप्रिल रोजी जयंतीच्या मुख्य दिवशी सकाळी तक्षशीला बुद्ध विहार येथे नगरसेविका आरतीताई यशवंतकर, योगेश भोकरकर यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व अनुयायांनी एकत्रितपणे भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले.

याप्रसंगी नगरसेवकांच्या वतीने तक्षशीला बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष तथा पंचशील नगर भीम जयंती मंडळाचे अध्यक्ष सिध्दार्थ जाधव यांच्यासह उपस्थितीत सर्वांना भारतीय संविधानाची उद्देशिका भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

मिरवणुकीपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राचे पूजन करण्यात आले. त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात आणि अतिशय उत्साहपूर्ण पण शांततामय वातावरणात मिरवणूक काढण्यात आली. शहराच्या मुख्य मार्गावरून जात या मिरवणुकीचा समारोप डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या ठिकाणी करण्यात आला.

# चोरट्यांचा दागिण्यांसह नगदी रक्कमेवर डल्ला

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– शहरातील महात्मा फुले नगरात घरातील मंडळी नातेवाईकांच्या लग्नासाठी गावाकडे गेले असल्याने कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कमेवर चोरट्यांनी डल्ला मारल्याची घटना गुरुवार, दि. १६ एप्रिल रोजी उघडकीस आली आहे.

महात्मा फुले नगरातील शिक्षक संतोष राऊत यांच्या घरी वीज वितरण कंपनीचे कर्मचारी साहेबराव गायकवाड हे किरायाने राहत होते. घरी लग्न असल्याने गावाकडे गेले होते. घराच्या दरवाजाचे कुलूप नसल्याचे घरमालकाच्या लक्षात आल्यावर त्यांनी फोन करून माहिती दिली. लगेच घरी आल्यावर कुलूप दिसले नाही, याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी पाहणी केली असता कपाटातील सामान असता व्यस्त टाकून त्यातील सोन्या-चांदीचे, दागिने रोख रक्कम असा अंदाजे एकूण पाच लाख रुपयांचे साहित्य चोरून नेल्याची तक्रार दिली आहे.

# इनामी जमीन नियमानुकूल करण्याची प्रक्रिया सुलभ करा; आ. कल्याणकर यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या मौजे असदुलाबाद इनामी जमिनीची अनेक प्रकरण प्रलंबित असल्याचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले.



त्यामुळे ही सगळी प्रकरणं लवकरात लवकर निकाली काढून निमानुकुल करण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात येईल अशी माहिती जिल्हाधिकारी कर्डिले यांनी आजच्या बैठकीत दिली. दरम्यान देगलूर नाका आणि पीरबुऱ्हाण नगर येथील मंजूर असलेल्या सबस्टेशनसाठी जागा तातडीने उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी आ. कल्याणकर यांनी यावेळी केली.

आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्या-मुळे असदुलाबाद येथील इनामी जमिनीचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागताना दिसून येतो. मगनपुरा भागातील सर्वे नंबर २८, २९ आणि ४२ वरील इनाम निरस्त करण्यासंदर्भात प्रदीर्घ चर्चा करून ते कोणत्या कायद्यानुसार नियमित करता येतील यासंदर्भात आ. बालाजीराव कल्याणकर यांनी प्रशासनास महत्त्वाच्या सूचना दिल्या.

हैदराबाद संस्थानिकांनी काही इनाम १९५४ पूर्वी निरस्त केल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिल्यामुळे मगनपुरा येथील २८, २९ आणि ४२ या सर्वे नंबरवरील इनाम निरस्त करता येईल. हा धोरणात्मक निर्णय जिल्हाधिकारी यांनी घ्यावा यासाठी ही त्यांनी सूचना दिल्या. याशिवाय अन्य सर्व्हे नंबरवरील इनाम खालसा करताना शासनाने दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजीच्या राजपत्रातील सूचनांचे पालन करून मालमत्ता-धारकांना ही प्रक्रिया सोपी व सुलभ करावी, असे आ. बालाजीराव कल्याणकर यांनी सूचित केले. त्यानंतर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी या संदर्भात लवकरात लवकर निर्णय घेतले जातील, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# ओटीपीच्या भरवशावर नका ठेवू व्हॉट्स ॲप




## सुरू करा Passkey फीचर, कोणी चोरू शकणार नाही तुमचा डेटा

**आजकाल सायबर फसवणुकीची प्रकरणे इतकी वाढली आहेत की तुम्ही वापरत असलेल्या ॲप्सवर सर्वात सुरक्षित सेटिंग्ज चालू करणे महत्त्वाचे आहे. असेच एक ॲप म्हणजे व्हॉट्सॲप. तुम्ही पासकी (Passkey) फीचर चालू केल्यास, ते तुम्हाला सायबर फसवणुकीपासून वाचवतेच, शिवाय तुम्हाला ओटीपीशिवाय ॲपमध्ये लॉग इन करण्याची परवानगीही देते. अशा परिस्थितीत, तुम्ही तुमच्या व्हॉट्सॲपमधील पासकी फीचर नक्कीच चालू केले पाहिजे. हे एक प्रगत तंत्रज्ञान आहे जे तुमचे व्हॉट्सॲप खाते तुमच्या फिंगरप्रिंट किंवा फेस आयडीने लॉक करते. तुम्ही हे फीचर चालू केले असल्यास, तुम्हाला लॉग इन करण्यासाठी ६-अंकी कोडची वाट पाहावी लागत नाही. इतकेच नाही, तर तुमचे सिम सक्रिय नसतानाही ते तुम्हाला तुमच्या खात्यात प्रवेश करण्याची परवानगी देते. हे तुमचे खाते ओटीपीपेक्षा अधिक हॅक-प्रूफ बनवते.**

### पासकी कसे काम करते?

व्हॉट्सॲप पासकी फीचर तुमचे व्हॉट्सॲप खाते तुमच्या फोनशी जोडते. हे तंत्रज्ञान सार्वजनिक आणि खासगी अशा दोन डिजिटल की वापरून काम करते. जेव्हा तुम्ही हे फीचर सक्षम करता, तेव्हा एक डिजिटल की व्हॉट्सॲपच्या सर्व्हरवर आणि दुसरी तुमच्या फोनवर संग्रहित केली जाते. जेव्हा तुम्ही तुमच्या व्हॉट्सॲप खात्यात लॉग इन करता, तेव्हा तुम्हाला तुमचा फिंगरप्रिंट किंवा फेस आयडी द्यावा लागतो. त्यानंतर व्हॉट्सॲप या दोन्ही गोष्टी जुळवते आणि यशस्वी पडताळणी झाल्यावर तुम्हाला तुमच्या खात्यात प्रवेश करण्याची परवानगी देते. यामुळे ओटीपी कोडची गरज राहत नाही. सोप्या भाषेत सांगायचे तर, तुमचा फोन तुमच्या खात्याची चावी बनतो आणि तुमचे बायोमेट्रिक्स ते अनलॉक करतात.

### पासकीचे फायदे काय?


सर्वात मोठा फायदा हा आहे की, तुम्हाला तुमच्या व्हॉट्सॲप खात्यात लॉग इन करण्यासाठी ओटीपीची वाट पाहावी लागत नाही. तुमचे खाते हॅक होण्यापासून सुरक्षित होते. तुमच्या बायोमेट्रिक्समुळे कोणीही तुमचे खाते चोरू शकत नाही. तुम्ही तुमचा फिंगरप्रिंट किंवा फेस आयडी वापरून क्षणार्धात तुमच्या खात्यात लॉग इन करू शकता. हे फीचर चालू केल्यानंतर, तुमच्याकडे सिम कार्ड नसले तरीही, तुम्ही ज्या फोनवर तुमची व्हॉट्स ॲप पासकी तयार केली आहे, त्या फोनवरून तुमच्या खात्यात लॉग इन करू शकाल. हे फीचर तुम्हाला सिम-आधारित फसवणुकीपासून देखील वाचवते. जरी कोणी तुमचे सिम कार्ड क्लोन केले, तरी बायोमेट्रिक्सच्या अभावामुळे ते तुमच्या खात्यात प्रवेश करू शकणार नाहीत.

### फीचर कसे चालू करावे?

सर्वप्रथम, व्हॉट्सॲप उघडा आणि सेटिंग्जमध्ये जाण्यासाठी वरच्या उजव्या कोपऱ्यातील तीन-ठिपक्यांवर ( ) टॅप करा. सेटिंग्जमध्ये, तुम्हाला अकाउंटचा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करा. पासकीजचा पर्याय निवडा. आता, क्रिएट अ पासकी (Create a Passkey) बटणावर टॅप करा. एक पॉप-अप दिसेल; कंटिन्यू (Continue) वर क्लिक करा. तुमचा फोन तुम्हाला स्क्रीन लॉक, फिंगरप्रिंट, फेस आयडी किंवा पिन विचारेल. एकदा तुम्ही ते व्हेरिफाय केले की, तुमची पासकी तयार होईल.

# 14 जूननंतर लागणार पैसे, 10 वर्षे जुने आधार आताच करून घ्या मोफत अपडेट

**तुमचे आधार १० वर्षे जुने आहे का? तसे असल्यास, तुम्ही तुमचे आधार अपडेट करून घ्यावे. असे न केल्यास अनेक कामांना विलंब होऊ शकतो. हे लक्षात घेण्यासारखे आहे की आधार अपडेट करण्याचे काम १४ जूनपर्यंत विनामूल्य करता येईल. त्यानंतर आधार अद्ययावत करण्यासाठी शुल्क आकारले जाईल. ज्यांची कार्डे १० वर्षांपूर्वी जारी झाली आहेत, त्यांनी त्यांच्या आधार कार्डमधील ओळख आणि पत्त्याचा पुरावा अद्ययावत करावा, असा सल्ला UIDAI देत आहे. तुम्ही हे तुमच्या फोन किंवा लॅपटॉपवरून सहजपणे करू शकता.**



हे लक्षात घेतले पाहिजे की एका दशकात पत्ते आणि चेहऱ्याची वैशिष्ट्ये बदलू शकतात. त्यामुळे माहिती अचूक ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आधार अद्ययावत न केल्यास सरकारी अनुदान थांबवले जाऊ शकते. बँक केवायसीमध्ये समस्या येऊ शकतात आणि इतर आधार-संबंधित सेवा बंद होऊ शकतात. म्हणूनच दर १० वर्षांनी एकदा आधार अद्ययावत करणे आवश्यक मानले जाते आणि ही विनामूल्य सेवा १४ जूनपर्यंत उपलब्ध आहे.

### दर 10 वर्षांनी अपडेट करणे का आवश्यक?

- UIDAI नुसार, आधार डेटा अचूक असणे आवश्यक आहे. १० वर्षे हा एक मोठा कालावधी आहे, ज्या दरम्यान व्यक्तीच्या दिसण्यात आणि पत्त्यात बदल होण्याची शक्यता असते. तुमची ओळख आधारशी जुळवताना कोणतीही अडचण येऊ नये आणि कोणतेही आवश्यक अपडेट्स चुकवू नयेत यासाठी, UIDAI दर १० वर्षांनी एकदा तुमचा आधार अपडेट करण्याची शिफारस करते.
- आधार मोफत कसा अपडेट करावा?
- अधिकृत आधार वेबसाइट, myaadhaar.uidai.gov.in वर जा आणि तुमचा आधार व OTP वापरून तुमच्या खात्यात लॉग इन करा.
- जेव्हा डॅशबोर्ड उघडेल, तेव्हा 'डॉक्युमेंट अपडेट' टॅबवर क्लिक करा. नीट पाहिल्यास, तुम्हाला लाल रंगात लिहिलेले दिसेल की ही सेवा १४ जूनपर्यंत विनामूल्य आहे.
- पुढील पानावर, तुम्हाला तुमची सध्याची माहिती दिसेल, जसे की नाव, लिंग, जन्मतारीख आणि पत्ता. जर सर्व काही बरोबर असेल, तर I verify that the above details are correct या चेकबॉक्सवर टिक करा.
- आता, तुम्हाला ओळखीचा पुरावा (POI) आणि पत्त्याचा पुरावा (POA) अपलोड करावा लागेल. प्रथम, ड्रॉपडाउन सूचीमधून तुम्ही अपलोड करणार असलेले दस्तऐवज निवडा, जसे की मतदार ओळखपत्र, पॅन कार्ड, रेशन कार्ड, इत्यादी.
- एकदा दस्तऐवज अपलोड झाल्यावर, 'सबमिट' वर क्लिक करा. ही सेवा १४ जूनपर्यंत विनामूल्य असल्याने तुम्हाला कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही.
- शेवटी, तुमचा सेवा विनंती क्रमांक (SRN) नोंदवून घ्या. याचा वापर करून तुम्ही तुमच्या विनंतीची स्थिती देखील तपासू शकता.


### या गोष्टी लक्षात ठेवा

तुमचा आधार अपडेट करताना तुम्ही अपलोड करत असलेल्या कागदपत्राची प्रत किंवा फोटो स्पष्ट असावा आणि कोणतीही माहिती अस्पष्ट नसावी. तुम्ही अपलोड केलेल्या कागदपत्रातील नाव तुमच्या आधारमधील नावाशी जुळले पाहिजे. स्पेलिंगमध्ये तफावत असल्यास ती आधी दुरुस्त करणे आवश्यक आहे. अपलोड केलेल्या कागदपत्राचा आकार २MB पेक्षा जास्त नसावा. शिवाय, पोर्टल फक्त JPEG, PNG, किंवा PDF फॉरमॅटमधील फाईल्स स्वीकारते. त्यामुळे, तुमचे कागदपत्र याच फॉरमॅटमध्ये असणे आवश्यक आहे.

# अनोळखी नंबरवरून आलाय कॉल किंवा मेसेज?

## घरबसल्या सरकारी पोर्टलवर ऑनलाइन दाखल करा तक्रार

आजकाल अनेक प्रकारचे घोटाळे होत आहेत. घोटाळेबाज मेसेज, कॉल आणि ईमेलद्वारे लोकांना लक्ष्य करत आहेत. सरकार अशा घोटाळ्यांविरुद्ध नियमितपणे सूचना जारी करते. अनोळखी नंबरवरून आलेल्या मेसेजमधील लिंक्सवर क्लिक न करण्याचा सल्ला लोकांना दिला जातो. तसेच, कॉलवर कोणालाही आपला ओटीपी न सांगण्याचाही सल्ला दिला जातो. अनेक इशाऱ्यांनंतरही, काही लोक अजूनही घोटाळेबाजांच्या जाळ्यात अडकतात. लोकांनी त्यांच्या फोनवर आलेले घोटाळेबाजांचे कॉल किंवा मेसेज यांची तात्काळ तक्रार करावी. त्यांना कुठेही जाण्याची गरज नाही. ते त्यांच्या मोबाईल फोनवरून एनसीआरपीवर (राष्ट्रीय सायबर गुन्हे तक्रार नोंदणी पोर्टल) तक्रार दाखल करू शकतात. ही प्रक्रिया खूप सोपी आहे...




### एनसीआरपी म्हणजे काय?

एनसीआरपी (राष्ट्रीय सायबर गुन्हे तक्रार नोंदणी पोर्टल) हा भारत सरकारचा एक उपक्रम आहे. तो गृह मंत्रालयाने सुरू केला आहे. याचा मुख्य उद्देश नागरिकांना सर्व प्रकारच्या सायबर गुन्ह्यांची तक्रार करण्याची संधी देणे हा आहे. गृह मंत्रालयाद्वारे चालवले जाणारे हे पोर्टल राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पोलिसांच्या सहकार्याने काम करते.

### तक्रार कशी करावी?

या पोर्टलवर तक्रार करणे खूप सोपे आहे. असे करण्यासाठी, तुम्हाला cybercrime.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी लागेल. त्यानंतर, वरील रिपोर्ट अँड चेक सस्पेक्ट (Report & Check Suspect) सेक्शनवर क्लिक करा. आता, रिपोर्ट सस्पेक्ट (Report Suspect) पर्यायावर क्लिक करा. पुढेच रिपोर्ट सस्पेक्ट टू आय४सी (Report Suspect to I4C) हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करा. येथे, तुम्हाला तुमचे राज्य निवडायचे आहे. त्यानंतर, तुम्हाला कोणता नंबर, मेसेज किंवा वेबसाइट रिपोर्ट करायची आहे, ते निवडावे लागेल. जर तुम्हाला एखादा नंबर रिपोर्ट करायचा असेल, तर फोन नंबर पर्यायावर क्लिक करा. आता, तुमची तक्रार नोंदवा.

### सावध रहा...

फसवणूक टाळण्यासाठी, अनोळखी नंबरवरून येणाऱ्या कॉलवर तुमची वैयक्तिक माहिती कधीही शेअर करू नका. ईमेलमधील लिंक्सवर क्लिक करू नका. ओटीपी (OTP) कोणासोबतही शेअर करू नका.



# अजब-गजब

## 106 वर्षांचे स्वामी सर्वानंद दूर धरलेले वृत्तपत्रही चष्म्याविना वाचतात

**रायपूर (छत्तीसगढ) :** वय १०६ वर्षे... चेहऱ्यावर सुरकुत्या पडलेल्या... पण शरीर अद्याप तंदुरुस्त आणि कोणतेही आव्हान पेलण्यासारखे मजबूत. त्यांची स्मरणशक्तीही जबरदस्त आणि दृष्टी अशी की, चष्म्याची मदत न घेताही दूर धरलेले वृत्तपत्र वाचतात... योग ऋषी स्वामी सर्वानंद सरस्वती यांच्याकडे पाहून कुणालाही विश्वास बसणार नाही की ते इतक्या वयाचे आहेत... स्वामी सर्वानंद यांचा जन्म झाला होता वाराणसीत. वयाच्या १६ व्या वर्षी त्यांनी संन्यास स्वीकारला. तेव्हापासून तर आजपर्यंत ते देश-विदेशात योगा, प्राणायाम आणि शुद्ध शाकाहारा प्रती लोकांना जागरूक करतात. एका कार्यक्रमानिमित्त रायपुरात आलेल्या सर्वानंद महाराजांनी पत्रकारांशी संवाद साधून, आपल्या दीर्घायुष्याचे रहस्य सांगितले. वयाच्या सातव्या वर्षांपासून सर्वानंद योगा करत आहेत. २० वर्षे त्यांनी कठीण तप केले. साधू-महाराजांना हिंदी, संस्कृतशिवाय स्थानिक भाषेव्यतिरिक्त अन्य भाषांचे ज्ञान नसते. पण सर्वानंद महाराजांना इंग्रजी, फ्रेंच भाषेसह भारतातील विविध राज्यांत बोलल्या जाणाऱ्या सात भाषा येतात. भाजीपाला उकडल्यामुळे आणि दूध तापवल्याने त्यातील पौष्टिकता संपते. त्यामुळे ते कच्चेच खाल्ले गेले पाहिजेत, असे स्वामी सर्वानंद म्हणतात. गेल्या ९० वर्षांत आपण कधीच मीठ आणि साखर खाल्ली नाही आणि मैद्याच्या वस्तूही कधी ग्रहन केल्या नाहीत. याचमुळे आपण दीर्घायुषी झालो, असेही त्यांनी सांगितले.



## कॉमिक्स लिहिणाऱ्या कथाकाराने तयार केला 7 फुटांचा अनोखा पेन

**लंडन :** आतापर्यंत अनेक कॉमिक्स लिहून बच्चे कंपनीपासून तर वृद्धापर्यंत सर्वांनाच हसवणाऱ्या अवलियाला काय वाटले कुणास ठावूक. त्याने चक्क असा पेन बनवला आहे, जो आश्चर्य बनला आहे. तब्बल सात फुटांचा हा पेन आता त्याला कॉमिक्सपेक्षाही अधिक प्रसिद्धी मिळवून देत आहे. काही जण हा पेन विकत घेण्यासाठी सरसावले आहे. पण तूर्त, कॉमिक्सकाराने तो विकण्यास नकार दिला आहे. जिम वुडरिंग असे या कॉमिक्स व्यंगचित्रकाराचे नाव असून, तो कथाही लिहितो. सात फुटांचा पेन बनविण्याची कल्पना त्याला कॉमिक्सपासूनच सुचली. आतापर्यंत आपल्या अनेक कथांत त्याने गंमतीने अशा प्रकारच्या पेनाचा उल्लेख केला होता आणि चित्र रेखाटले होते. पण असा पेन आपण स्वतःला बनवला तर... हा विचार त्याच्या डोक्यात आला आणि त्याने तो प्रत्यक्षातही आणला. या पेनाला त्याने निब्स मॅक्सिमस असे नाव दिले आहे. सिएटल शहराच्या गेज आर्ट्स ॲकॅडमीत त्याने नुकतेच आपल्या पेनाचे प्रदर्शन ठेवले होते. या वेळी त्याने या पेनापासून काही चित्रेही बनवून दाखविली. विशेष पेनाने चांगले लिहिताही येते. लाकडापासून हा पेन तयार करण्यात आलेला असून, हा पेन बघून सर्व जण जिमचे कौतुक करत आहेत.

## हजार फुटांवरून कोसळला... तरीही सहिसलामत वाचला!

**लंडन :** ज्यांनीही त्याला पडताना पाहिले, त्यांनी तो आता वाचणार नाहीत, असाच विचार केला होता. पण बहुधा त्याचा काळ आला होता पण वेळ आली नव्हती. त्यामुळेच १००० फुटांवरून पडूनही तो सहिसलामत वाचला. ग्लासगो येथील ३५ वर्षीय ॲडम पॉटर यमाच्या हातावर तुरी देण्यात यशस्वी ठरला पण लोकांना अजूनही त्याला जीवंत पाहून स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसत नाही...

ॲडम आपल्या प्रेयसी आणि दोन मित्रांसोबत स्कॉटलंडच्या मुनरो पर्वतावर चढाई करण्यासाठी गेला होता. तो ३ हजार ५८९ फूट उंचीवरील सगुर चोइनिच मोर शिखरावर पोहचणार होता, तितक्यात त्याचा पाय घसरला. तो पडत असताना त्याचे मित्रही त्याला वाचविण्यास असमर्थ ठरले. त्यामुळे डोळ्यांदेखत ॲडमला मृत्यूच्या खाईत कोसळताना बघण्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हते. पण चमत्कार झाला. ॲडम जेथून पडला होता, तेथून हजार फूट खाली एका पठारावर येऊन आदळला. पण त्याला किरकोळ जखमांशिवाय काहीही झाले नव्हते. तो उठून लगेच पुन्हा पर्वत चढण्यासाठी तयार झाला. तोपर्यंत त्याच्या मित्रांनी मदतीसाठी सेनेचे हेलिकॉप्टर बोलावून घेतले होते. सैनिकांनी येऊन त्याला पुन्हा चढाई करण्यास रोखले आणि



हेलिकॉप्टरमध्ये बसवून रूग्णालयात दाखल केले. तेथे गेल्यानंतर डॉक्टरांनी त्याला त्याच्या पाठीत तीन फ्रॅक्चर झाल्याचे सांगितले. ॲडम पडत असताना पाहणाऱ्या मित्रांना तर वाटले होते की आता ॲडमचे मृत शरीरच घरी घेऊन जावे लागणार. पण दैवाने ॲडमला तारले. आता बरा झाल्यावर पुन्हा एकदा ॲडम पर्वत चढाईच्या मोहिमेवर जाणार आहे. कोणत्याही परिस्थितीत ते शिखर पादक्रांत करण्याचा निर्णय त्याने बोलून दाखवला.

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री विठ्ठल माणिका भोसले वय ४६ रा. ता.जि. नांदेड यांनी दिनांक १३.०२.२०२६ रोजी या कार्यालयात त्यांचे मुलाचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव माधुरी विठ्ठलराव भोसले रा. थुगाव ता.जि. नांदेड यांचा राहते घर रा. थुगाव ता.जि. नांदेड या ठिकाणी दिनांक २८.०८.२००८ या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक १३.०२.२०२६ रोजी तहसील कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत लेखी आक्षेप या तहसील कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक २०.०३.२०२६
स्थळ - नांदेड
तहसीलदार नांदेड करीता

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४६९

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७ मालमत्ता क्र. ८७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सुलोचना संतोष क्यादलवाड, सुनिल धोंडबा कदम हिमायतनगर, हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ८७ वार्ड न. १७ संतोष कोंडबा क्यादलवाड यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ३६७/२०२६ दि. १५/०४/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - प्लॉट क्र. ८६,
पश्चिमेस - प्लॉट क्र. ८८,
दक्षिणेस - ६ मीटरचा रस्ता,
उत्तरेस - नाला.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड.
(दरपत्रक सुचना)

दुरध्वनी:- ०२४६२- २३४४०४
ई-मेल पत्ता:- info@nwcmc.gov.in
पत्ता:- वजिराबाद, नांदेड
फॅक्स क्र. ०२४६२-२३२०७१

**ई- निविदा सुचना क्र.नांवाशमनपा/पापुवजनि/५५२/२०२५,दिनांक :-१७.०३.२०२६** सन - २०२५-२६

आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड पाणी पुरवठा व्यवस्था अंतर्गत पाणी शुध्दिकरणासाठी व निर्जतुकीकरण करणेसाठी औषधी (रसायणे) च्या वार्षिक पुरवठयासाठी खालील दिलेल्या तपशिलवार स्वत: उत्पादक अथवा त्याचे अधिकृत वितरक यांचेकडुन विहीत "ड" नमुन्यात ई-निवीदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निवीदा मागवित आहोत. निविदा कागदपत्र संकेतस्थळावर https:/mahatenders.gov.in येथून डावूनलोड करण्यात यावी. तसेच निवीदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**कामाचे नाव:-** महापालिकेच्या सर्व जलशुध्दीकरण केंद्रावर द्रवरुप पी.ए.सी. पावडर (PAC IS 15573 Powder High Basecity Liquid) पुरवठा करणे व द्रवरुप पी.ए.सी.पावडर साठवण्यासाठी पाईपलाईनसह (Providing Storage tank & pipe line for PAC IS 15573 Powder High Basecity Liquid) टाकी उभारणे बाबत.

(एकुण ०१ कामे) :- अंदाजित रु. ३६,९०,०००/-
ई निवीदा उपलब्ध कालावधी :- १८.०४.२०२६ ते ३०.०४.२०२६
ई निवीदा उघडणे :- ०४.०५.२०२६.

स्वाक्षरीत/-
अतिरिक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

# पाहिजेत

श्री विरशैव शिक्षण प्रसारक मंडळ कासराळी संचलित

**महात्मा बसवेश्वर मागासवर्गीय मुलांचे (अनुदानित) वस्तीग्रह बिलोली ता.बिलोली जि. नांदेड**

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | जागा | पद |
|---|---|---|---|
| १) | १० वी पास किमान | ०१ | अधिक्षक |
| २) | ७ वी पास | ०१ | स्वयंपाकी |

तरी पात्र उमेदवारांनी मुलाखतीसाठी शैक्षणिक पात्रतेच्या मूळ कागदपत्रांसह स्वखर्चाने खालील पत्त्यावर दि.०४/०५/२०२६ रोज सोमवार सकाळी ११ वाजता महात्मा बसवेश्वर मा.व मुलांचे वस्तीग्रह(अमोल नगर) बिलोली ता.बिलोली जि. नांदेड येथे उपस्थित रहावे.

**अध्यक्ष**
**श्री वीरशैव शिक्षण प्रसारक मंडळ**
**कासराळी ता. बिलोली जि. नांदेड**

## Change In Name

My old name is **BILEWAD SURYAKANT GANGADHAR,** which I am changing as a new name **BILLEWAD SURYAKANT GANGADHAR.** Henceforth My all correspondence will be done as per my new name. please consider the same.

**Contact - Billewad Suryakant Gangadhar**
**At Raykhod, Tq Bhokar**
**Dist Nanded 431801**
**9822550987**

### नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
जाहिरात प्रगटन
(नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, मुखीदोद्दीन नईमोद्दिन महम्मद यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (३७१), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (०२) मालमत्ता नं. (७११/३८) नवीन वार्ड क्र. (११) नवीन मालमत्ता नं. (५५०/३८) साईज पूर्व-पश्चिम ३०.४८ मीटर, दक्षिण-उत्तर ७.६२ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : २० फुटाचा रस्ता,
पश्चिमेस : भोकर - मुदखेड रोड,
दक्षिणेस : प्लॉट नं.३, उत्तरेस : प्लॉट नं. ०१.

श्री रमीजोद्दीन तकीयोद्दीन इनामदार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

### नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
जाहिरात प्रगटन
(नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, हणमंत गंगाधर बदरे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५२३), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (०९) मालमत्ता नं. (डी-८५) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (३०६६/४) साईज पूर्व-पश्चिम ९.१४ मीटर, दक्षिण-उत्तर १२.५ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : ६.१० मीटरचा रस्ता,
पश्चिमेस : गट नं. ५२३,
दक्षिणेस : पांदण, उत्तरेस : प्लॉट नं. १०.

श्री मंगेश संभाजी बल्लेवार, गिताबाई मिराशे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

### नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
जाहिरात प्रगटन
(नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, राजेश्री तुकाराम शिराणे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (४२), जुना वार्ड नं. (०३) मधील प्लॉट नं. (६३) मालमत्ता नं. (२०७१) नवीन वार्ड क्र. (०२) नवीन मालमत्ता नं. (२०७१/३) साईज पूर्व-पश्चिम ९.५० मीटर, दक्षिण-उत्तर ९.०० मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : सदरील प्लॉट पैकी भाग,
पश्चिमेस : शिवप्रसाद यांचे शेत,
दक्षिणेस : २० फुट रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. ६२.

श्री देविदास चिन्नना पुरनोड यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

### नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
जाहिरात प्रगटन
(नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, दिलीप बापुराव पवार यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५५४), जुना वार्ड नं. (०३) मधील प्लॉट नं. (४३) मालमत्ता नं. (११२५) नवीन वार्ड क्र. (०२) नवीन मालमत्ता नं. (११५७) साईज पूर्व-पश्चिम ४० फुट, दक्षिण-उत्तर ३० फुट.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : २० फुटाचा रस्ता रस्ता,
पश्चिमेस : प्लॉट नं. ७८,
दक्षिणेस : प्लॉट नं. ४२, उत्तरेस : प्लॉट नं. ४४.

श्री शेख सरवर साब शेख महेबुब साब यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

### नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
जाहिरात प्रगटन
(नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, मारोती दत्ता सूर्यवंशी यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५६५), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (१२) मालमत्ता नं. (इ-२९५/११) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (१५०५/११) साईज पूर्व-पश्चिम १२.२० मीटर, दक्षिण-उत्तर ९.१५ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. ६.१० मीटरचा रस्ता,
पश्चिमेस : प्लॉट नं. ८९,
दक्षिणेस : प्लॉट नं. १३, उत्तरेस : प्लॉट नं. ११

श्री सुनिल सुधाकर सूर्यवंशी, कल्पेश रायपत्रेवार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

### नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
जाहिरात प्रगटन
(नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अविनाश हरिदास मस्के यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५६५), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (११) मालमत्ता नं. (इ-२९५/१०) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (१५०५/१०) साईज पूर्व-पश्चिम १२.२० मीटर, दक्षिण-उत्तर ९.१५ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. ६.१० मीटरचा रस्ता,
पश्चिमेस : प्लॉट नं. ९०,
दक्षिणेस : प्लॉट नं. ९८, उत्तरेस : प्लॉट नं. ६८

श्री सुनिल सुधाकर लोखंडे, कल्पेश रायपत्रेवार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४६८

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८अ मालमत्ता क्र. ६२३ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सय्यद समीर सय्यद मुस्तफा खुबा चौक मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ६२३ वार्ड न. १८अ रिजवान अहेमद मोमीन खलील अहेमद मोमीन यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ५३७/२०२६ दि. ०८/०४/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - २० फुटाचा रस्ता,
पश्चिमेस - प्लॉट नं. १२,
दक्षिणेस -प्लॉट क्र. १६,
उत्तरेस - प्लॉट क्र. १८.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४६७

नाव परिवर्तन वार्ड क्र. १४ मालमत्ता क्र. १३० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सय्यद वसीम सय्यद रज्जाक नई आबादी मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १३० वार्ड न. १४ जियारहेमान अब्दुल वहाब यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ५४५/२०२६ दि. ०७/०४/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - प्लॉट क्र. २०,
पश्चिमेस - कॉलनी रस्ता,
दक्षिणेस -प्लॉट क्र. १८,
उत्तरेस - प्लॉट क्र. १६.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४६६

नाव परिवर्तन वार्ड क्र. १९ मालमत्ता क्र. २५२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मनोजकुमार भीमराव चव्हाण रा. बुलकुलवाडी मोहल्ला किनवट यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २५२ वार्ड न. १९ भीमराव ताराचंद चव्हाण, अक्षयकुमार भीमराव चव्हाण यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ३४१४/००२/२०२६ दि. १५/१४/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - ------,
पश्चिमेस - ------,
दक्षिणेस -------,
उत्तरेस - ------.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४६५

नाव परिवर्तन वार्ड क्र. १०अ मालमत्ता क्र. १२८ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, रामराव खेमा आडे रा. खैरगाव मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १२८ वार्ड न. १०अ गुलमहम्मद खान नुरोद्दिन यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ४८९/२०२६ दि. २८/०३/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - कॉलनी रस्ता,
पश्चिमेस - प्लॉट क्र. ८४,
दक्षिणेस -प्लॉट क्र. ८२,
उत्तरेस - कॉलनी रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४६४

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०९ मालमत्ता क्र. ५६ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, खैरूनिसा बेगम सय्यद हमीद व इतर रा. हिमायतनगर मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५६ वार्ड न. ०७ शेख युसुफ शेख इस्माईल यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी वारसा शपथ पत्र क्र. ५/२०२५ दि. १३/०४/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - ------, पश्चिमेस - ------ , दक्षिणेस - ------, उत्तरेस - ------

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४६३

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. ७८५ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, असरार अहेमद उस्मान खान रा. मेरठ मोहल्ला मेरठ यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ७८५ वार्ड न. १५ अब्दुल गुलशन अब्दुल हमीद यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १६८/२०२४ दि. १७/१०/२०२४ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - प्लॉट क्र. ५९,
पश्चिमेस - प्लॉट क्र. ५५,
दक्षिणेस -कॉलनी रस्ता,
उत्तरेस - प्लॉट क्र. ५७

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४६२

नाव परिवर्तन वार्ड क्र. १९ मालमत्ता क्र. ४२८ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, आबेदाबी अजीज अब्दुल रा. रहिम कॉलनी मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४२८ वार्ड न. १९ खाजाबी शेख मुसा यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ११७/२०२४ दि. ०१/०१/२०२४ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - विठ्ठलराव वानखेडे यांचे शेत, पश्चिमेस - गंगाबाई पाटील यांचे शेत, दक्षिणेस -मोकळी जागा, उत्तरेस - १५ फुटाचा रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.४७०

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०४ मालमत्ता क्र. १२० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, योगिता श्रीनिवास कानवटे रा. सांगवी मोहल्ला किनवट यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १२० वार्ड न. ०४ विश्वंभर वामनराव वानखेडे यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ९५/२०२६ दि. १९/०१/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - विठ्ठलराव वानखेडे यांचे शेत, पश्चिमेस - गंगाबाई पाटील यांचे शेत, दक्षिणेस -मोकळी जागा, उत्तरेस - १५ फुटाचा रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



### श्रीक्षेत्र माहूरगड येथे विकासकामांना गती

## भाविकांसाठी दर्जेदार सुविधांवर भर - पालकमंत्री अतुल सावे

**नांदेड (प्रतिनिधी) –** श्रीक्षेत्र माहूरगड येथे सुरू असलेल्या विकासकामांमधून भाविकांना अधिकाधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत, यासाठी सर्व विभागांनी समन्वयातून नियोजनबद्ध कामे पूर्ण करावीत, असे निर्देश राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले.

### ◆ विविध विकासकामांची पाहणी करून आढावा घेतला



माहूर येथे श्रीक्षेत्र माहूरगड विकास आराखड्याचा आढावा शुक्रवारी घेण्यात आला. यावेळी आ. भीमराव केराम, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपवनसंरक्षक मनीषा पाटील, सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी जेनीतचंद्र दोन्तुला, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

माहूर हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. त्यामुळे भाविकांना सोयीस्कर, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विकासकामांना गती देण्याच्या सूचना पालकमंत्री अतुल सावे यांनी दिल्या. तसेच या पवित्र स्थळाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, अडचणी तत्काळ सोडविल्या जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी पालकमंत्री सावे यांनी श्री रेणुका देवी मंदिर परिसर, मातृतीर्थ कुंड, पर्यटक सुविधा केंद्र, वाहनतळ तसेच इतर पायाभूत सुविधांच्या पहिल्या टप्प्यातील कामांचा सविस्तर आढावा घेतला. यासोबतच दुसऱ्या टप्प्यातील श्री दत्त मंदिर व शिखर परिसर, श्री अनुसया देवी मंदिर, कैलास टेकडी, श्री महादेव मंदिर, वनदेव मंदिर, कपिलेश्वर मंदिर, विविध दर्गे, बौद्ध विहार, जमदग्नी कृषी मंदिर, गणपती मंदिर परिसर तसेच पोचमार्ग विकास, वन विभाग व पुरातत्व विभागाच्या कामांचा आढावा घेण्यात आला. एकूण सुमारे ८२९.१३ कोटी रुपयांच्या विकासकामांचा यामध्ये समावेश आहे. यापूर्वी पालकमंत्री अतुल सावे यांनी श्री रेणुका देवीचे दर्शन घेतले तसेच श्री दत्तशिखर संस्थानास भेट देऊन महंत धनेश्वर भारती (योगी श्याम भारती महाराज) यांची भेट घेतली. तसेच मधुसूदन भारती महाराज यांच्या समाधीस्थळाला अभिवादन केले.

दरम्यान, बैठकीत आदिवासी विभागाच्या विविध योजनांचाही आढावा घेण्यात आला. किनवट येथील रेल्वे उड्डाणपूल प्रस्ताव, वीज पुरवठा समस्या, कापूस जिनिंग युनिट विस्तार, प्राथमिक आरोग्य केंद्रांची प्रगती, गोदाम उभारणी आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

## इज्जतगावात मध्यरात्री पोलिसांची अवैध वाळू उपशावर कारवाई, १.७० कोटींचा मुद्देमाल जप्त

**नायगाव बाजार (प्रतिनिधी) –**नांदेड जिल्ह्यात अवैध वाळू उपसा व वाहतुकीवर लगाम घालण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन प्लश आऊट' अंतर्गत बिलोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांनी इज्जतगाव येथे मध्यरात्री टाकलेल्या धाडीत मोठी कारवाई करत तब्बल १ कोटी ७० लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या धाडीत तीन हायवा, एक जेसीबी, दोन फायबर बोटी आणि अंदाजे आठ ब्रास काळी रेती जप्त करण्यात आली.



पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. बिलोली येथील उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांना गुप्त बातमीदारामार्फत नायगाव तालुक्यातील इज्जतगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या वाळू उपसा सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. त्यानुसार कुंटूर व नायगाव पोलीस ठाण्यांच्या संयुक्त पथकाने १७ एप्रिल रोजी मध्यरात्री सुमारे २ वाजताच्या सुमारास अचानक छापा टाकला.

छाप्यादरम्यान मारोती डोईफोडे (उपसरपंच) यांच्या शेतालगत असलेल्या विटभट्टीजवळ बोटींच्या सहाय्याने वाळू उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले. घटनास्थळी तीन हायवा, एक जेसीबी तसेच नदीपात्रात मोठी व लहान अशा दोन फायबर बोटी आढळून आल्या. पंचांच्या उपस्थितीत संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, हलविणे अशक्य असलेल्या फायबर बोटी जिलेटीनच्या साहाय्याने जागीच नष्ट करण्यात आल्या. या प्रकरणी आरोपी नवनाथ सटवाजी चेलकेवाड रा. कहाळा (खु), सोनाजी काशीराम हेंडगे रा. कहाळा (खु.), भानुदास बालाजी हंडेवार रा. मनुर, साईनाथ माधवराव पांडे रा. रुई (बु), कैलास गंगाधर शिंदे रा. मनूर, विठ्ठल भुजंगा शिंदे रा. मनूर ता. नायगांव, साईनाथ महाजन चिलमवाड रा. डोनगाव ता. मुदखेड जि. नांदेड, मारोती गोविंदराव डोईफोडे रा. इज्जतगाव ता. नायगांव, जि. नांदेड, ज्ञानेश्वर भीमराव पांडुर्णे रा. मारतळा ता. लोहा जि. नांदेड व इतर ३ जणांच्या विरोधात पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण सोनकांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कुंटूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नाळेश्वर महसूल मंडळात महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून मिळतोय विविध योजनांचा लाभ –आमदार कल्याणकर



**नांदेड (प्रतिनिधी) –**छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून शासन आपल्या दारी आले असून, शासनाच्या विविध योजनांचा लाभ जनतेला एकाच ठिकाणी मिळत आहे, असे नांदेड उत्तर विधानसभेचे आ. बालाजीराव कल्याणकर यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्रमांक एक अंतर्गत नांदेड तालुक्यातील नाळेश्वर महसूल मंडळात शुक्रवार, दि. १७ एप्रिल रोजी नाळेश्वर येथे आयोजित शिबिराचे उद्घाटन आमदार कल्याणकर यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण मुंडे, लिंबगावचे सहायक पोलीस निरीक्षक पंढरी बोधनकर, नायब तहसीलदार महसूल सुनील माचेवाड, नायबतहसीलदार निवडणूक इंद्रजीत गरड, सरपंच उषाताई वाघ, नरहरी वाघ, पंढरी पाटील बोकारे, नारायण पाटील कदम खडकीकर, अनिल पाटील क्षीरसागर, संतोष भारसावडे, धनंजय पावडे, नवनाथ काकडे, वैद्यकीय अधिकारी रहाटी डॉ. राठोड, मंडळ कृषी अधिकारी सानप, पोलीस उपनिरीक्षक पोफळे, अनुलोमचे पांडुरंग बुद्धेवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

आ. कल्याणकर पुढे बोलताना म्हणाले की, महाराजस्व समाधान शिबिरात विविध विभागाचे स्टॉल लावण्यात येऊन विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यात येत आहे. जनतेला याचा फायदा होत आहे.

कार्यक्रमाचे आरंभी जिल्हा परिषद नाळेश्वर शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. प्रास्ताविक तहसीलदार संजय वारकड यांनी केले. त्यांनी विविध योजनांची माहिती दिली. उपविभागीय अधिकारी नांदेड डॉ. सचिन खल्लाळ यांनी विविध विभागांचे स्टॉल लावून योजना सामान्यांपर्यंत पोहचत असल्याने नागरिक आणि प्रशासन यांच्यामधील नाळ अधिक घट्ट होत असल्याचे सांगितले.




**नांदेड –**शहरातील देगलूर नाका भागात शुक्रवारी डबक्यात बुडून चार मुलांचा मृत्यू झाला. या घटनास्थळाला महापौर कविता मुळे यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी सभागृह नेता महेश कनकदंडे, सभापती वीरेंद्रसिंग गाडीवाले, मनपाचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, संतोष मुळे, एम.आय.एम.चे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद मोईन, माजी उपमहापौर तथा नगरसेवक मसुद अहमद खान, नगरसेवक सय्यद फसीद्दीन, अब्दुल हफिज बागवान, अन्सार अहमद खान, हबीब बागवान, मोहम्मद अल्ताफ, रहिम अहमद खान, भाजीपाला मार्केट असोसिएशनचे अध्यक्ष मोहम्मद जावेद बागवान, खय्युम मामु, बाबु भाई बागवान, सहाय्यक आयुक्त रावण सोनसळे, अझर बागवान, अब्दुल बारी आदी उपस्थित होते.

(छाया : करणसिंह बैस, नांदेड)

## शिक्षिकेला खंडणी मागणाऱ्या एकाविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी) –**जिल्हा परिषदेच्या शिवणी ता. किनवट येथील शाळेत कार्यरत असलेल्या एका महिला शिक्षिकेला धमकी देऊन पाच हजार रुपयांची खंडणी मागणाऱ्या एकाविरुध्द इस्लापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुष्पा संजय पाटील ह्या शिवणी येथील जि. प. शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. शाळेतील पोषण आहाराचे फोटो तसेच शिक्षिका पुष्पा पाटील यांचे फोटो मोबाईलमध्ये संजय उद्धव वाथोरे याने दि.१३ एप्रिल रोजी काढले. सदरील फोटो सोशल मीडियावर प्रसारित करण्याची धमकी त्याने दिली. तसेच संजय वाथोरे याने शिक्षिका पुष्पा पाटील यांच्याकडे ५ हजार रुपये खंडणीची मागणी केली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा नोंदविण्यात आला.

## 'दमरे'कडून काकीनाडा टाउनहिसार दरम्यान नांदेड, पूर्णा, हिंगोली मार्गे विशेष गाडीची घोषणा

**नांदेड (प्रतिनिधी)–** उन्हाळ्याच्या हंगामात प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने काकीनाडा टाउन ते हिसार दरम्यान मुदखेड-नांदेड, पूर्णा-बसमत, हिंगोली-वाशीम-अकोला मार्गे विशेष गाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामुळे प्रवाशांना अतिरिक्त प्रवास सुविधा उपलब्ध होऊन गर्दीच्या काळात अधिक सुलभ आणि आरामदायी प्रवास करता येणार आहे.

गाडी क्रमांक ०७७१७ काकीनाडा टाउनहिसार विशेष गाडी २१ एप्रिल (मंगळवार) रोजी काकीनाडा टाउन स्थानकावरून सकाळी ०५.४० वाजता सुटेल आणि मुदखेड (२२.१५), नांदेड (२३.१०), पूर्णा (००.४०), बसमत (०१.१०), हिंगोली (०२.३५), वाशिम (०३.५५), अकोला (०५.४५), भुसावळ, वडोदरा, रतलाम आणि चित्तौडगड या प्रमुख स्थानकांमार्गे गुरुवारी १३.४० वाजता हिसार येथे पोहोचेल.

परतीच्या प्रवासात, गाडी क्र. ०७७१८ हिसार-काकीनाडा टाउन विशेष गाडी २४ (शुक्रवार) रोजी हिसार येथून १४.१० वाजता सुटेल आणि रविवारी १२.३५ वाजता काकीनाडा टाउन येथे पोहोचेल.

## मध्यवर्ती बसस्थानकातून महिलेच्या पर्समधील दीड लाखाचे दागिने लंपास

**नांदेड (प्रतिनिधी) –**शहरातील मध्यवर्ती बसस्थानकामधून एका महिलेच्या पर्समधील १ लाख ५८ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना बुधवार, दि. १५ एप्रिल रोजी घडली आहे.

सध्या लग्नसराई व विद्यार्थ्यांना सुट्या लागल्याने बसस्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी होत आहे. बुधवारी दुपारी एक महिला मध्यवर्ती बसस्थानकात बसची वाट पाहत थांबली असताना अज्ञात चोरट्यांनी गर्दीचा फायदा घेऊन महिलेच्या पर्समधील १ लाख ५८ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले आहेत. रंजीत शिरसे रा. जाकापूर ता. कंधार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वजिराबाद पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार शेळके करत आहेत. बसस्थानकात पर्समधील दागिने चोरीच्या काही घटना घडल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता या ठिकाणी पोलिसांची संख्या वाढविण्याची मागणी होत आहे.

## मोफत 'एचपीव्ही' लसीकरण

### ॲड. दिलीप ठाकूर व सुमती व्याहाळकर यांचा पुढाकार



**नांदेड (प्रतिनिधी) –** भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस ॲड. दिलीप ठाकूर आणि महिला मोर्चा प्रदेश चिटणीस सुमती व्याहाळकर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या मोफत एचपीव्ही लसीकरण शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. रमेश माने यांच्या हस्ते तर डॉ. रमेश नारलावार यांच्या अध्यक्षतेखाली व शीतल खांडील यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडले. मुलींमध्ये होणारा गर्भाशयाचा कर्करोग रोखण्यासाठी राबविण्यात आलेल्या या महत्त्वपूर्ण उपक्रमांतर्गत २७ मुलींना ४ हजार पाचशे रुपये किंमतीची लस मोफत देण्यात आली.

भाजप नांदेड महानगर, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल, अमरनाथ यात्रेकरू संघ तसेच मनपा नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने शिवशक्तीनगर, नांदेड येथे हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. खा. अशोकराव चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे व चैतन्य देशमुख, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे व ॲड. किशोर देशमुख, महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, लायन्स उपप्रांतपाल योगेश जायस्वाल यांचे मार्गदर्शन मिळाले.

संयोजक ॲड. दिलीप ठाकूर यांनी शिबिरामागील उद्दिष्ट स्पष्ट करताना, समाजात कर्करोग प्रतिबंधाबाबत जनजागृती होणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. हनुमंत रिठे व वैद्यकीय अधिकारी डॉ. रितेशसिंह बिसेन यांनी मार्गदर्शन करताना एचपीव्ही लसीबाबत समाजमाध्यमांवर पसरविण्यात येणाऱ्या गैरसमजुती दूर करण्याचे आवाहन केले.

सूत्रसंचालन राजेशसिंह ठाकूर यांनी केले, तर आभार नरसिंह कहाळेकर यांनी मानले. मनपा कर्मचाऱ्यांमध्ये शेख फिरोज, रवि धुतमल, शेख सुमैय्या, अनुराधा शिवशेट्टे, अंबिका थोटे, देऊबाई लव्हाळे, अनिता हनमंते, पुष्पा खाडे, जिजाबाई गायकवाड, लता सूर्यवंशीसुमैय्या, अनुराधा शिवशेट्टे, अंबिका थोटे, देऊबाई लव्हाळे, अनिता हनमंते, पुष्पा खाडे, जिजाबाई गायकवाड, लता सूर्यवंशी यांनी शिबीर यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## सुमनबाई बुयरे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी) –**



नायगाव तालुक्यातील मौजे लालवंडी येथील रहिवासी तथा सध्या नांदेडमध्ये वास्तव्यास असलेल्या श्रीमती सुमनबाई प्रल्हादराव (भाऊ गुरु) बुयरे लालवंडीकर यांचे दि. १५ एप्रिल रोजी रात्री ८.३० वाजता निधन झाले. त्या ८१ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात ३ मुली, जावई, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.

## तेजोत्सवात आज ज्ञानपर्व : अतुलशास्त्री भगरे गुरुजींचे व्याख्यान, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते उद्घाटन

**नांदेड (प्रतिनिधी) –**नांदेड शहरात उत्साहपूर्ण वातावरणात सुरू झालेल्या श्री परशुराम तेजोत्सव कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी धार्मिक, सामाजिक आणि वैचारिक पर्व रंगणार असून ज्येष्ठ प्रवचनकार अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभासाठी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमात ब्राह्मण समाजातील नवनिर्वाचित नगरसेवकांचा, पुरस्कार प्राप्त सामाजिक, प्रशासकीय, सांस्कृतिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार होणार आहे. या कार्यक्रमाला राजकीय सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहेत.

सायंकाळी ७ ते १०:३० या वेळेत 'प्रत्येक युगातील ब्राह्मण' या विषयावर 'झी मराठी फेम' अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांचे व्याख्यान होणार आहे, अशी माहिती कार्यक्रमाचे संयोजक तथा अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी दिली आहे.

भगवद्गीतेतील १८ व्या अध्यायांवर आधारित 'संभवामि युगे युगे' हा नृत्याविष्कार गुरु सोनाली करंदीकर आणि त्यांच्या नाशिक येथील शिष्यांकडून सादर केला जाणार आहे. श्री परशुराम तेजोत्सवानिमित्त शहरात भक्तिमय आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले असून, विविध धार्मिक कार्यक्रम, पूजन विधी, समाजप्रबोधनपर उपक्रम आणि सांस्कृतिक सादरीकरणांमुळे नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. तेजोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमाकडे विशेष लक्ष लागले असून भगरे गुरुजी आपल्या ओजस्वी वाणी, अभ्यासपूर्ण मांडणी आणि संस्कारमूल्यांनी युक्त विचारांमुळे श्रोत्यांमध्ये विशेष लोकप्रिय आहेत. त्यांच्या व्याख्यानातून धर्म, कर्तव्य, संस्कृती आणि आधुनिक जीवनमूल्यांचा समन्वय साधणारे मार्गदर्शन मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com